बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकः बाळासाहेब मस्के

बीड | बुधवार दि.२ जुलै २०२५ | वर्षे ४थे | अंक २९९वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

# मोबाईलवरून आता मतदान

## ई-मतदानाला परवानगी देणारे बिहार पहिले राज्य

### मतदान केंद्रांवर पोहोचू न शकणाऱ्या मतदारांसाठी ही सुविधा

◆ **पाटणा (वृत्तसंस्था) :**

घरबसल्या आता मोबाईलवरून मतदान करता येणार आहे. मोबाईल फोन ॲपद्वारे ई-मतदानाला परवानगी देणारे बिहार देशातील पहिले राज्य ठरले आहे. शनिवारी पाटणा, रोहतास आणि पूर्व चंपारण या तीन जिल्ह्यांतील सहा नगर परिषदांमध्ये मोबाईलवरून मतदान झाले. विशिष्ट मतदारांना e SECBHR ॲपद्वारे मतदानाची सुविधा उपलब्ध केली गेली. ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती, गरोदर महिला आणि स्थलांतरित मतदारांना या योजनेचा लाभ घेता आला आहे. बिहार राज्यातील हा प्रयोग यशस्वी झाल्यास देशभरात मोबाईलवरून मतदान करण्याची सुविधा उपलब्ध होऊ शकते.

**ई-मतदानासाठी नोंदणी**

भारतात प्रथमच मोबाईल ॲपद्वारे मतदान करता येणार आहे. हे मतदान प्रथम बिहारमध्ये झाले आहे. ज्यामुळे देशाच्या लोकशाही प्रक्रियेत एक नवे युग सुरू होणार आहे. सहा नगर परिषदांच्या निवडणुकीत हा पथदर्शी प्रकल्प राबवला जात असून, मतदान केंद्रांवर पोहोचू न शकणाऱ्या मतदारांसाठी ही सुविधा आहे. यामध्ये ब्लॉकचेन तंत्रज्ञान, चेहरा ओळख प्रणाली आणि डिजिटल सुरक्षा यांसारख्या प्रगत तंत्रज्ञानांचा वापर करून मतदान प्रक्रिया सुरक्षित आणि पारदर्शक ठेवण्यात येणार आहे. बिहारचे राज्य निवडणूक आयुक्त दीपक प्रसाद यांनी सांगितले की, "१० हजार मतदारांनी ई-मतदानासाठी नोंदणी केली असून, ५० हजार मतदारांना मतदान केंद्रावर न जाता मोबाईलद्वारे मतदान करता येईल."

हे ॲप सध्या केवळ अँड्रॉइड फोनवरच उपलब्ध आहे. मतदारांनी हे ॲप आपल्या मोबाईलवर डाऊनलोड करून ते त्यांच्या मतदार यादीतील नोंदणीकृत फोन नंबरशी लिंक करणे आवश्यक आहे. सी-डॅक या संस्थेने हे ॲप विकसित केले असून दुसरे एक ॲप राज्य निवडणूक आयोगानेही तयार केले आहे.




**...असे करता येईल ई-मतदान :**
ई-मतदानासाठी फक्त दोन नोंदणीकृत मतदार एका फोन नंबरवरून लॉगिन करू शकतात. प्रत्येक मतदाराचे ओळखपत्र तपासून मतदानाची वैधता निश्चित केली जाईल. ज्यांच्याकडे मोबाईल नाही, त्यांनाही राज्य निवडणूक आयोगाच्या वेबसाइटवरून मतदानाची सुविधा उपलब्ध आहे.

**सुरक्षेसाठी केलेले उपाय**

- एका मोबईल क्रमांकावरून जास्तीत जास्त दोन नोंदणीकृत मतदार लॉगिन करू शकतात.
- मतदान करण्यापूर्वी चेहरा स्कॅनिंग आणि मतदार ओळखपत्राशी जुळवणी केली जाईल.
- संपूर्ण मतदान प्रक्रिया ब्लॉकचेन तंत्रज्ञानाद्वारे सुरक्षित आणि हॅक-प्रूफ बनवली गेली आहे.
- बिहारमध्ये ई-वोटिंगसाठी नोंदणी कशी करावी?
- ॲप इन्स्टॉल केल्यानंतर आपला मोबाईल क्रमांक टाका आणि तो मतदार यादीशी लिंक करा.
- मोबाईल क्रमांक सत्यापित झाल्यानंतर तुमची नोंदणी पूर्ण होईल.
- याशिवाय मतदानाच्या दिवशी तुम्ही ॲप किंवा राज्य निवडणूक आयोगाच्या वेबसाइटद्वारे मतदान करू शकता.

**फसवणूक टाळण्यासाठी उपायः**

- एका मोबाईल क्रमांकावरून फक्त दोन मतदार लॉगिन करू शकतात.
- प्रत्येक मताची मतदार ओळखपत्राशी पडताळणी केली जाते.
- ई-मतदानासाठी नोंदणी प्रक्रिया

**ई-वोटिंग प्रणालीची वैशिष्ट्ये**

ही नवीन ई-वोटिंग प्रणाली ब्लॉकचेन तंत्रज्ञान आणि चेहरा ओळख यासारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित आहे, जी मतदान प्रक्रियेला पारदर्शी आणि सुरक्षित बनवते. ही सुविधा प्रामुख्याने ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती, गर्भवती महिला आणि स्थलांतरित मतदार जे मतदान केंद्रापर्यंत पोहोचू शकत नाहीत, यांच्यासाठी आहे.

# हे मराठीचे प्रेम नाही, तर मनपा निवडणुकांचे राजकारण



### हिंदी सक्तीच्या मुद्द्यांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा उबाठा सेनेवर निशाणा

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

मी कोणासमोर प्रश्नचिन्ह निर्माण करणार नाही. महापालिका निवडणुका नसत्या तर कदाचित हिंदी विषयाच्या निर्णयाला इतका वेगळा विरोध झाला नसता. राज ठाकरेंची भूमिका आणि आमची भूमिका वेगळी आहे. सगळ्याच भूमिका सारख्या असत्या तर एका पक्षात राहिलो असतो. भूमिका वेगळी असू शकते; परंतु मुख्यमंत्रीपदी असताना, उद्धव ठाकरेंनी जर एखादा रिपोर्ट स्वीकारला आणि त्याविरोधातच आता बोलत आहेत. यामध्ये राजकारण आहे. या राज्यात माशेलकर, मुणगेकर यांच्यासारख्या लोकांवर प्रश्नचिन्ह लावता येईल का?, देवेंद्र फडणवीसांना राजकारण करायचे आहे असे बोला, पण तज्ज्ञांनी एखादा रिपोर्ट दिला. तो तुम्ही मुख्यमंत्री असताना स्वीकारला आणि आता त्याउलट जात आहात याचा अर्थ हे मराठीचे प्रेम नाही तर हे राजकीय आहे असे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उबाठा सेनेवर निशाणा साधला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रात मराठीची सक्ती आहे, हिंदी सक्ती नाही. हिंदी पर्यायी भाषा आहे. हिंदी किंवा अन्य कुठलीही भारतीय भाषा शिकता येईल. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात त्रिभाषा सूत्र दिले आहे. हे सूत्र आपण स्वीकारले आहे. जेव्हा २०२० साली हे धोरण आले तेव्हा महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार होते. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना या धोरणावर अभ्यास करण्यासाठी कमिटी तयार केली. त्याचे अध्यक्ष माशेलकर होते. त्यात डॉ. मुणगेकर, सुखदेव थोरात यांच्यासारखी प्रमुख १८ मंडळी होती. या सर्वांनी एक रिपोर्ट तयार केला आणि तो २०२१ साली उद्धव ठाकरे सरकारला दिला. तो रिपोर्ट तेव्हाच्या सरकारने स्वीकारला. हा तोच रिपोर्ट आहे ज्यात त्रिभाषा सूत्र सांगितले आहे आणि त्यात स्पष्टपणे मराठीसोबत इंग्रजी आणि हिंदी सक्ती करा असे अहवालात म्हटले आहे. त्यावेळच्या बातम्या पाहा, वेगवेगळ्या भाषा शिकायला हव्यात असं उद्धव ठाकरे म्हणाले. आता माशेलकर, मुणगेकर, सुखदेव थोरात यांना महाराष्ट्रद्रोही ठरवणार आहात का? असा सवाल त्यांनी विचारला.

## प्रवास झाला स्मार्ट ! 'हायवे यात्रा' ॲप सांगणार कमी टोलचा रस्ता

◆ **नवी दिल्ली (प्रतिनिधी):**

जर तुम्ही अनेकदा राष्ट्रीय महामार्गावर रोड ट्रिप करत असाल तर तुमच्यासाठी एक आनंदाची बातमी आहे. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय) लवकरच त्यांच्या राजमार्ग यात्रा या मोबाइल ॲपमध्ये एक नवीन फीचर जोडणार आहे. या फीचरच्या मदतीने तुम्हाला कळेल की दोन शहरांमधील कोणत्या मार्गावर सर्वात कमी टोल टॅक्स असेल, अशी माहिती रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी दिली.

**केंद्रीय मंत्री नितीन गडकरींची माहिती**

हायवे यात्रा ॲप २०२३ मध्ये लाँच करण्यात आले होते. हे ॲप हायवेवरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना रस्त्यांची परिस्थिती, सुविधा आणि आपत्कालीन सेवांशी संबंधित माहिती देते. आता त्यात जोडण्यात येणाऱ्या नवीन फीचरमुळे टोलची तुलना करणे सोपे होईल. अँड्रॉइड फोन वापरकर्ते हे ॲप गुगल प्ले स्टोअरवरून डाउनलोड करू शकतात. आता जेव्हा एखादा प्रवासी ॲपवर त्याच्या गंतव्यस्थानाच्या प्रवासाचा शोध घेतो तेव्हा ॲप विविध मार्गांचे टोल शुल्क दाखवेल.

## पराग जैन 'रॉ'चे नवे बॉस

**नवी दिल्ली :** ऑपरेशन सिंदूरमध्ये महत्त्वाची भूमिका बजावलेले पराग जैन यांची केंद्र सरकारने रिसर्च अँड ॲनालिसिस विंग (रॉ) चे नवे प्रमुख म्हणून नियुक्ती केली आहे. पराग जैन हे सध्याचे रॉ प्रमुख रवी सिन्हा यांची जागा घेणार आहे.



रवी सिन्हा यांचा सध्याचा कार्यकाळ ३० जून रोजी संपत आहे. तर जैन १ जुलै रोजी दोन वर्षांच्या निश्चित कार्यकाळासाठी पदभार स्वीकारणार आहे. पराग जैन हे १९८९ च्या बॅचचे पंजाब कॅडरचे आयपीएस अधिकारी आहेत.

## भाजपा प्रदेशाध्यक्षांची १ जुलै रोजी निवड

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**



भारतीय जनता पक्षाच्या नव्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षांची निवड येत्या १ जुलै रोजी करण्यात येणार असल्याची माहिती पक्षाचे प्रदेश निवडणूक अधिकारी आमदार चैनसुख संचेती यांनी शनिवारी दिली.

भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश अध्यक्ष पदाच्या तसेच राष्ट्रीय परिषद सदस्य निवडणुकीच्या कार्यक्रमाची घोषणा करण्यात आली आहे. त्यानुसार २९ जून रोजी पक्षाच्या राज्य परिषद सदस्यांची घोषणा करण्यात येणार आहे. तसेच राष्ट्रीय परिषद सदस्य निवडीचा कार्यक्रम जाहीर करण्यात येणार आहे. ३० जून रोजी भाजपा प्रदेश कार्यालयात प्रदेशाध्यक्ष पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. दुपारी ३ ते ५ या वेळात हे अर्ज दाखल करता येतील. १ जुलै रोजी सकाळी १० वाजता प्रदेश अध्यक्षांच्या व राष्ट्रीय परिषद सदस्यांच्या निवडीची घोषणा करण्यात येईल, अशी माहिती प्रदेश निवडणूक अधिकारी आमदार चैनसुख संचेती यांनी दिली आहे.

## वेचक

### काँगो-रवांडात ऐतिहासिक शांतता करार

**वाशिंग्टन :** काँगो आणि रवांडा या देशांनी अमेरिकेच्या मध्यस्थीनंतर झालेल्या शांतताच्या करारावर स्वाक्षऱ्या केल्या. दोन्ही देशांमध्ये गेल्या दशकभरापासून पूर्व काँगोमध्ये सुरू असलेल्या संघर्षाला समाप्त करण्यासाठी अमेरिकेच्या पुढाकाराने हा शांतता करार करण्यात आला. या करारामुळे या भागातील अमेरिका सरकाच्या आणि अमेरिकेतील कंपन्यांना खनिजांचे उत्खनन करता येणार आहे. आज शनिवारपासून या भागातील संघर्ष समाप्त झाला असून आशा आणि संधी, सौहार्द, समृद्धी आणि शांततेचा नवीन अध्याय सुरू झाला आहे, असे अमरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितले.

### गडचिरोली जिल्हा अजूनही नक्षलग्रस्त

**मुंबई :** मार्च २०२६ पूर्वी देश नक्षलमुक्त करण्याच्या मोहिमेचा भाग म्हणून राज्यातील नक्षलग्रस्त भागात राज्य सरकारकडून प्रभावी कारवाया केल्या जात आहेत. असे असताना आता गडचिरोली जिल्हा आणि गोंदिया जिल्ह्यातील गोंदिया, सालेकसा, देवरी व अर्जुनी मोरगाव हे चार तालुकेच नक्षलप्रभावीत असल्याचे स्पष्ट केले आहे. राज्य सरकारने पोलीस महासंचालकांच्या माध्यमातून राज्यातील नक्षलग्रस्त भागाचा फेरआढावा घेत पुन्हा एकदा नव्याने नक्षलग्रस्त भागाची घोषणा गृहविभागाने केली आहे.

### मुंबईला येणाऱ्या विमानात अचानक बिघाड

**मुंबई :** एअर इंडियाच्या विमानाला झालेल्या अपघाताची घटना ताजी असताना आता इथिओपियन एअरलाइन्सच्या विमानात शुक्रवारी रात्री उशिरा गंभीर तांत्रिक बिघाड झाला. एअरलाइन्सच्या बोईंग ७८७ ड्रीमलायनर विमानात डिप्रेशरायझेशनची परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे सात प्रवाशांची प्रकृती बिघडली. या विमानानं मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर मध्यरात्री १ वाजून ५५ मिनिटांनी इमर्जन्सी लँडिंग केलं. विमानातील एका प्रवाशाची प्रकृती गंभीर असल्याने त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले. विमानात जवळपास ३०० प्रवासी होते.



### पुरी जगन्नाथ यात्रेत चेंगराचेंगरीत ६०० जखमी

**पुरी :** ओडिशामधील पुरी येथे जगन्नाथ रथयात्रेदरम्यान शुक्रवारी रात्री रथ ओढताना चेंगराचेंगरी झाली. यामध्ये ६०० भाविक जखमी झाले असून, यातील ८ जण अत्यवस्थ आहेत. जखमी भाविकांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, भाविकांच्या प्रचंड गर्दीमुळे पहिल्या दिवशी रथाने केवळ ७५० मीटर अंतर पार केले. शनिवारी रथ यात्रेच्या दुसऱ्या दिवशी सकाळी १० वाजल्यापासून पुन्हा एकदा रथ यात्रा सुरू होणार आहे. शुक्रवारी रथयात्रेच्या पहिल्या दिवशी रात्री देवी सुभद्राच्या रथाभोवती गर्दी वाढली होती.



**सोन्याचा भाव**

| | |
|---|---|
| २४ कॅरेट प्रति तोळा | ९७४२० रुपये |
| २२ कॅरेट प्रति तोळा | ८९३०० रुपये |



**चांदीचा भाव**

| | |
|---|---|
| प्रति किलो | १०७८०० रुपये |

# पाकिस्तानी सैनिकांवर खैबर पख्तूनख्वा प्रांतात आत्मघाती हल्ला

**१३ सैनिक ठार, अनेक जखमी**

◆ **नवी दिल्ली (वृत्तसंस्था):**

पाकिस्तानमधील खैबर पख्तूनख्वा प्रांतात उत्तर वझिरीस्तान जिल्ह्यात एक भीषण हल्ला झाला. पाकिस्तानी सैनिकांच्या ताफ्याला लक्ष्य करण्यात आले आहे. या आत्मघाती बॉम्बस्फोटात तब्बल १३ सैनिक ठार झाले. खैबर पख्तूनख्वा प्रांतातील उत्तर वझिरीस्तान जिल्ह्यात हा बॉम्बस्फोट झाल्याची घटना शनिवारी घडली. उत्तर वझिरीस्तान जिल्ह्यात एका ठिकाणी हल्लेखोरांनी स्फोटकांनी भरलेले एक वाहन लष्करी ताफ्यावर धडकावल्याचे सांगण्यात आले. या हल्ल्यात १९ नागरिक जखमी झाल्याचे एका स्थानिक अधिकाऱ्याने सांगितले.

अधिकाऱ्याने म्हटले की, "हल्लेखोरांनी स्फोटकांनी भरलेले एक वाहन लष्करी ताफ्याजवळ आणले आणि ताफ्याला वाहनाची धडक दिली. यानंतर मोठा स्फोट झाला. या स्फोटात १३ सैनिक ठार झाले, १० लष्करी कर्मचारी आणि १९ नागरिक जखमी झाले." या घटनेबाबत एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की, स्फोटामुळे दोन घरांचे छप्पर कोसळले आणि सहा मुले जखमी झाली. हल्ल्यानंतर चार जखमी सैनिकांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे.

या हल्ल्याची जबाबदारी पाकिस्तान तालिबानशी संलग्न असलेल्या हाफिज गुल बहादूर गटाने घेतली आहे. २०२१ मध्ये तालिबानने अफगाणिस्तान ताब्यात घेतल्यापासून पाकिस्तानच्या सीमावर्ती भागात हिंसाचार मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे इस्लामाबादने काबुलवर सीमापार हल्ले करणाऱ्या दहशतवाद्यांना आश्रय देण्याचा आरोप केला आहे. मात्र, हा आरोप अफगाण तालिबान नाकारत आहे.

दरम्यान, एएफपीच्या आकडेवारीनुसार, वर्षाच्या सुरुवातीपासून खैबर पख्तूनख्वा आणि बलुचिस्तानमध्ये सरकारविरोधी सशस्त्र गटांनी केलेल्या हल्ल्यांमध्ये सुमारे २९० लोक, बहुतेक सुरक्षा कर्मचारी मारले गेले आहेत.

# राज्यातील सर्वात मोठे स्क्रॅपिंग सेंटर एसटीच्या जागेवर उभारले जाणार

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

### एसटीसाठी उत्पन्नाचा नवा स्त्रोत निर्माण करणार

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

जुनी वाहने शास्त्रोक्त पद्धतीने स्क्रॅप करून त्याचे सुटे भाग पुनःश्च वापरात येणार नाहीत, अशा पद्धतीने त्यांची विल्हेवाट लावणारे सर्वात मोठे स्क्रॅपिंग सेंटर (भंगार केंद्र) एसटी महामंडळ सार्वजनिक- खासगी भागीदारी तत्त्वावर उभारणार असून त्याद्वारे उत्पन्नाचा वेगळा व शाश्वत स्त्रोत भविष्यात एसटीला निर्माण होईल, असे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले.



केंद्र शासनाद्वारे सन २०२१ मध्ये रजिस्टर व्हेईकल स्क्रॅपिंग फॅसिलिटी नावाने १५ वर्षांपेक्षा जुनी वाहने शास्त्रोक्त पद्धतीने स्क्रॅप करून त्यांच्या सुट्या भागाचा पुनर्वापर होणार नाही, अशा पद्धतीने त्यांची विल्हेवाट लावण्यात यावी. यासाठी नवे धोरण बनवण्यात आले. सदर धोरण महाराष्ट्र शासनाने सन. २०२३ मध्ये स्वीकारले असून ऑटोमोटिव्ह इंडस्ट्री स्टँडर्डच्या अटी-शर्तीनुसार स्क्रॅपिंग केंद्राला मान्यता देण्याचे निश्चित केले आहे. त्यानुसार एसटी महामंडळाला देखील राज्यात ३ ठिकाणी अशा प्रकारचे स्क्रॅपिंग सेंटर उभारण्याची परवानगी मिळाली असून त्यापैकी पहिले आणि राज्यातील सर्वात मोठे स्क्रॅपिंग सेंटर छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील खुलताबाद येथे असलेल्या एसटी महामंडळाच्या १०० एकर जागेवर सार्वजनिक-खासगी भागीदारीतून उभारले जाणार आहे.

**एसटीला उत्पन्न मिळवून देणारा नवा स्त्रोत**

मंत्री सरनाईक म्हणाले की, सध्या शासनाच्या परवानगी ने राज्यात ८ संस्था स्क्रॅपिंग केंद्र चालवत असून त्यांची वर्षाला किमान १ हजार वाहने स्क्रॅप करण्याची क्षमता आहे. अशा संस्थांना शासनाच्या वतीने परवानगी देणारे परिवहन खाते हे देखील माझ्या अखत्यारीत असल्यामुळे एसटीचा अध्यक्ष आणि परिवहन मंत्री या नात्याने या प्रकल्पाला गती देऊन भविष्यात सर्वाधिक वाहने शास्त्रोक्त पद्धतीने स्क्रॅप करून त्याची विल्हेवाट लावणारे सर्वात मोठे सेंटर एसटीच्या माध्यमातून उभाले जाणार असून एक नवा उत्पन्नाचा स्त्रोत यातून निर्माण होईल, असा विश्वास आहे. या आढावा बैठकीमध्ये आवश्यक मनुष्यबळाची करार पद्धतीने भरती करणे, कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या बदल्या व बढत्यांचे निकष ठरवून ते अमलात आणणे, नवे वाहन खरेदी धोरण इत्यादी विषयावर चर्चा झाली.

# राज्यातील ५२ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

## पुण्यातील अमोल झेंडे, पिंपरीतील स्वप्ना गोरे यांची बदली

◆ **पुणे (प्रतिनिधी) :**

राज्यातील पोलीस उपायुक्त दर्जाच्या ५२ वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असून, पुणे पोलीस दलातील वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे, परिमंडळ दोनच्या उपायुक्त स्मार्तना पाटील, पिंपरीतील उपायुक्त स्वप्ना गोरे यांची बदली करण्यात आली आहे. त्यामध्ये, पुणे, मुंबई, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, ठाणे, धुळे, हिंगोली, जळगाव येथील अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

वाहतूक शाखेचे उपायुक्त अमोल झेंडे यांची दौंड येथील राज्य राखीव पोलीस दलात बदली करण्यात आली आहे. स्मार्तना पाटील यांची खंडाळा येथील पोलीस प्रशिक्षण केंद्रात बदली करण्यात आली आहे. शस्त्र निरीक्षण शाखेच्या अधीक्षक तेजस्विनी सातपुते यांची राज्य राखीव पोलीस दलात (गट क्रमांक एक) अधीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील उपायुक्त स्वप्ना गोरे यांची राज्य राखीव पोलीस दलात (गट क्रमांक दोन) येथे बदली करण्यात आली आहे.




पुण्यातील शस्त्र निरीक्षक शाखा पोलीस अधीक्षकपदी असलेल्या तेजस्वी सातपुते यांची समादेशकपदी बदली करण्यात आली आहे. पुणे राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १ पदावर त्यांना नियुक्ती देण्यात आली आहे; तर महेंद्र पंडित यांची स्तंभ २ मधून स्तंभ ३ मध्ये नमूद पदावर बदली करण्यात आली आहे. त्यानुसार, महेंद्र पंडित यांना बृहन्मुंबई पोलीस उपायुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

# मोबाईल व्हेरिफिकेशनसाठी मोजा पैसे

## लवकरच येणार नियम

◆ **नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**




दूरसंचार विभागाने मोबाईल फसवणूक रोखण्यासाठी सायबर सुरक्षा नियमात बदल करण्याचा प्रस्ताव दिला आहे. नव्या नियमांत मोबाईल व्हेरिफिकेशनसाठी एक प्लॅटफॉर्म तयार करण्याची शिफारस करण्यात आली आहे. यात व्हेरिफिकेशनसाठी सरकारी एजन्सी आणि खासगी कंपन्यांना नंबर शुल्क द्यावे लागेल. हा खर्च कंपन्या घेणार की युजर्सवर टाकणार याबाबत अजून निश्चित नाही.

२४ जून रोजी फाईल करण्यात आलेल्या सायबर सुरक्षा नियमांच्या नवीन मसुद्यानुसार फोन नंबर व्हेरिफिकेशनसाठी एक नवीन प्लॅटफॉर्म तयार करण्याची शिफारस करण्यात आली आहे. ज्यांच्याकडे कस्टमर व्हेरिफिकेशनचे लायसन्स आहे, त्या सगळ्यांना या प्लॅटफॉर्ममध्ये सहभागी करून घेण्याचा विचार आहे.

एमएनव्ही प्लॅटफॉर्मला सहभागी करून घेण्याचा प्रस्ताव दूरसंचार विभागाने ठेवला आहे. हा प्लॅटफॉर्म अधिकृत संस्था आणि परवानाधारकांना मदत करणार आहे. कंपनी किंवा युजर जो मोबाईल नंबर वापरत आहे, तो नंबर डेटाबेसमध्ये आहे किंवा नाही याचा तपास घेण्यात प्लॅटफॉर्म मदत करणार आहे. डिपार्टमेंट ऑफ टेलिकॉमने काही एन्टिटीजचा उल्लेख केला आहे.

**हिंद महासागरात भारताचा प्रभाव वाढणार**

# भारताची श्रीलंकेसोबत डॉकयार्ड डील

◆ **नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**

भारताची संरक्षण क्षेत्रातील सार्वजनिक कंपनी माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड श्रीलंकेत मोठे काम करणार आहे. ही कंपनी कोलंबो डॉकयार्ड पीएलसी (सीडीपीएलसी)मधील भागेदारी घेणार आहे. हा करार ५२.९६ दक्षलक्ष अमेरिकन डॉलर (म्हणजे ४५२ कोटी रुपये)चा आहे. भारताच्या सरकारी शिपयार्ड कंपनीने केलेले हे पहिले अधिग्रहण आहे. या कराराच्या माध्यमातून भारताचा हिंद महासागरात प्रभाव वाढणार आहे. चीनसाठी हा करार जोरदार धक्का असणार आहे.

**सहा महिन्यांत करार पूर्ण होणार**

■ माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड ही भारतातील सर्वात मोठी संरक्षण शिपयार्ड कंपनी आहे. या कंपनीने कोलंबो डॉकयार्डमध्ये ५१% भागेदारी मिळवण्याच्या करारावर सही केली आहे. हे अधिग्रहण प्राथमिक भांडवली गुंतवणूक आणि दुय्यम शेअर खरेदीच्या संयोजनाद्वारे होणार आहे. ज्यामध्ये जपानच्या ओनोमिची डॉकयार्ड कंपनी लिमिटेडकडून शेअर्सची खरेदी समाविष्ट आहे. चार ते सहा महिन्यांत हा करार पूर्ण होण्याची शक्यता आहे. करार पूर्ण होताच कोलंबो डॉकयार्ड भारताच्या एमडीएलची सहायक कंपनी बनणार आहे.

■ एनडीएलचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक कॅप्टन जगमोहन यांनी सांगितले की, सीडीपीएलसीमधील नियंत्रणात्मक भागभांडवलाचे संपादन हे आपल्या शिपयार्डला जागतिक जहाजबांधणी कंपनीमध्ये रूपांतरित करण्यासाठी महत्त्वाचे पाऊल आहे. दक्षिण आशियामध्ये वर्चस्व मिळवण्यासाठी एक महत्त्वपूर्ण दालन म्हणून हा करार असणार आहे.



**कराराचा चीनसाठी धक्का :** चीन श्रीलंकेत आपले पाय रोवण्याचा प्रयत्न करत आहे. तसेच चिनी नौदल हिंदी महासागरात आपली ताकद वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. चीन या भागात आपल्या जहाजांसाठी तळ शोधत आहे. या परिस्थितीत माझगाव डॉकचा हा करार भारताला या प्रदेशात मोठे स्थान मिळवून देईल. श्रीलंकेत चीनच्या धोरणात्मक घुसखोरीच्या पार्श्वभूमीवर हे एक मोठे पाऊल आहे.

# एसटी महामंडळाच्या निवृत्त कर्मचाऱ्यांना आता ओळखपत्र



◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

एसटी महामंडळाच्या निवृत्त कर्मचाऱ्यांना आता ओळखपत्र देण्यात येणार आहे. सेवा निवृत्तीनंतरच्या सवलती घेताना कोणतीही अडचण येऊ नये म्हणून एसटी महामंडळाकडून हा मोठा निर्णय घेण्यात आला आहे. एसटी महामंडळामध्ये सध्या ४० हजार निवृत्त कर्मचारी आहेत. या सेवा निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना एसटीच्या या निर्णयानंतर लाभ मिळणे सोपे होणार आहे.

इतकेच नाही तर एसटी महामंडळातून निवृत्त झाल्यानंतर त्यांची ओळख पटावी म्हणून हे ओळखपत्र त्यांना दिले जाणार आहे. यासह एसटी महामंडळाच्या निवृत्त कर्मचाऱ्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना देण्यात येणारा मोफत प्रवास पास ९ ऐवजी १२ महिन्यांसाठी मिळणार आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पत्नीलाही वर्षभर हा मोफत पास मिळणार आहे. दरम्यान, गेल्या काही दिवसांपूर्वी एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांना मूळ वेतनावर जूनपासून ४६ टक्क्यांऐवजी ५३ टक्के महागाई भत्ता मिळणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली होती.

# गोंधळी नको; विरोधक अभ्यासू हवेत...

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या सुरुवातीला विधान भवनात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये मोठा गदारोळ पाहायला मिळाला. काँग्रेसचे ज्येष्ठ आमदार नाना पटोले यांनी आक्रमक पवित्रा घेतल्यानंतर त्यांचे दिवसभरासाठी निलंबन करण्यात आले; परंतु विरोधी पक्षाच्या एका सदस्यांवर कारवाई केली म्हणून विरोधकांनी संपूर्ण दिवसभरातील कामकाजावर बहिष्कार टाकला. त्यामुळे गेले दोन दिवस जनतेच्या प्रश्नांवर विधानसभेत आवाज उठवला गेला असे चित्र दिसले नाही. शेतकऱ्यांबद्दल कृषिमंत्री माणिकराव कोकाटे आणि भाजपा आमदार बबनराव लोणीकर यांनी काही दिवसांपूर्वी वादग्रस्त वक्तव्य केले होते.

या दोन्ही नेत्यांवर कारवाई करण्याची मागणी करत काँग्रेस माजी प्रदेशाध्यक्ष आमदार नाना पटोले यांनी सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली. या दोघांवर कारवाई करण्याची मागणी करताना पटोले यांनी थेट विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या आसनाकडे धाव घेतली आणि हातवारे करत आक्रमकपणे बोलण्याचा प्रयत्न केला. नाना पटोलेंच्या या भूमिकेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही आक्रमक झाल्याचे दिसले. अध्यक्षांच्या अंगावर धावून जाणे चुकीचे असल्याचे सांगत त्यांनी पटोले यांना फटकारले. यावेळी सभागृहात जोरदार गदारोळ झाला. या सगळ्या राड्यानंतर विधानसभा अध्यक्षांनी पटोले यांच्यावर एका दिवसासाठी कारवाई करण्याची घोषणा केली. यानंतर विरोधकांनी अधिक आक्रमक होत घोषणाबाजी केली. या सरकारचे करायचे काय? ‘खाली डोकं वर पाय...’ माफी मागा... माफी मागा शेतकऱ्यांची माफी मागा... अशी घोषणाबाजी करत सभागृहात गोंधळ घातला. त्यानंतर सर्व विरोधकांनी सभात्याग केला. आता पुढे काय? उद्याही असा एखादा मुद्दा घेऊन विरोधक गोंधळ घालू लागले तर, मूळ कामकाज कसे होणार, याकडे आता लक्ष देण्याची गरज आहे. पावसाळी अधिवेशन पंधरा दिवसांचे असते. या काळात पुन्हा सभागृहात गोंधळ झाला, तर जनतेचे प्रश्न मांडणार कधी असा प्रश्न अनुत्तरित राहणार आहे.

लालफितीत अडकडलेल्या प्रशासकीय कामकाजाला गती देण्याचे काम विधिमंडळाच्या अधिवेशनाच्या माध्यमातून होते. जनतेतून निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना सन्मान असला तरी, ज्या जनतेतून तो निवडून येतो, त्याचे प्रश्न, समस्या सरकारच्या माध्यमातून लवकर मार्गी लागाव्यात यासाठी वर्षातून तीन वेळा विधिमंडळाचे अधिवेशन होत असते. नागपूर ही महाराष्ट्राची उपराजधानी असल्याने, एक अधिवेशन त्या ठिकाणी होते. अन्य दोन अधिवेशनेही राजधानी मुंबईत होतात. अधिवेशन सुरू होण्याआधी तारांकित प्रश्नांच्या माध्यमातून ४५ दिवस आधी जे प्रश्न विचारले जातात, त्याची उत्तरे संबंधित मंत्र्यांला लेखी स्वरूपात द्यावी लागतात. लक्षवेधी प्रश्न, हरकतीचा मुद्दा, औचित्यांचा मुद्दा, विशेष चर्चा आदींबाबत आमदारांना असलेल्या अधिकारांतून जास्तीत जास्त जनतेच्या प्रश्नांवर आवाज उठवला जाईल, अशी अपेक्षा असते. सर्वसाधारणपणे सभागृहात एखाद्या लोकप्रतिनिधीने मत मांडले ते खरे आहे असे मानून मंत्र्यांकडून त्यावर उत्तर दिले जाते; परंतु अलीकडच्या काळातील अधिवेशनातील कामकाज पाहता, जनतेच्या प्रश्नांवर सभागृहात चर्चा घडवून आणण्यापेक्षा किंवा या चर्चेत सहभागी होण्यापेक्षा विधिमंडळाच्या पायऱ्यांवर आंदोलन करण्यात आमदारांना अधिक रस असल्याचे दिसून येते. पायऱ्यांवर केलेल्या आंदोलनाला इलेक्ट्रॉनिक्स माध्यमातून प्रसिद्धी मिळत असल्याने, आपला चेहरा त्यात दिसावा अशी धडपड त्यात अनेकांची पाहायला मिळते; परंतु विधिमंडळाच्या आवारात केलेले आंदोलन हे रेकार्डवर नसते. ते दिवसभरातील एक प्रकारे मनोरंजन होते.

विधानसभेचे २८८ आमदार आहेत. ग्रामीण भागाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आमदाराला आपल्या मतदारसंघातील प्रश्न मांडण्याची संधी विधानसभेत मिळायला हवी असते; परंतु असे गोंधळ होत राहिले तर, आमदारांना जनतेच्या समस्यांवर प्रश्न विचारण्याची संधी कशी मिळेल? याचा अन्य सदस्यांनी विचार करायला हवा. आजचे उदाहरण घेऊ या... नाना पटोले यांनी अध्यक्षांच्या दालनांपर्यंत जाऊन गोंधळ घालण्याची खरंच गरज होती का? विधिमंडळ हे कायदे मंडळ आहे. राज्याच्या जनतेच्या हिताचे निर्णय विधेयक बहुमताने पारित करून केले जातात. त्यामुळे विधानसभा अध्यक्ष पदावर बसलेल्या व्यक्तीचा मान मोठा आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि विधानसभा अध्यक्ष यांचा दर्जा हा सारखा असतो. त्यामुळे, नाना पटोले यांच्यासारख्या विधानसभा अध्यक्षपद आधी भूषविलेल्या लोकप्रतिनिधींनी पदाचा मान राखायला हवा होता. पटोले यांनी काँग्रेस पक्षासारख्या राष्ट्रीय पक्षाची राज्याची धुराही सांभाळलेली आहे. तरीही त्यांचा संयम सुटला. पटोले यांच्यावरील कारवाईनंतर, विरोधी पक्षाच्या सदस्यांनी कामकाजावर बहिष्कार टाकण्याचा जो निर्णय घेतला, त्यातून जनतेच्या प्रश्नांवर विरोधक संवेदनशील नाहीत, हे पुन्हा एकदा दिसून आले.

‘नेमेचि येतो पावसाळा’ याप्रमाणे विधिमंडळ सचिवालयाकडून वर्षातून तीन अधिवेशने होत राहतील. या अधिवेशनासाठी कोट्यवधी रुपयांची तरतूद करावी लागते. तो पैसा जनतेच्या करातूनच खर्च केला जातो. त्यामुळे विरोधकांनी विधिमंडळाच्या कामकाजावर भर देत, जो जनतेचा आवाज आहे, तो सभागृहात मांडण्याकडे लक्ष द्यायला हवे. महाराष्ट्र विधानसभेची आजची स्थिती अशी आहे की, विरोधी पक्षाच्या आमदारांकडे पुरेसे आमदार नसल्याने विरोधी पक्ष नेते पदावर कोणाची वर्णी लागलेली नाही. आपले संख्याबळ कमी असताना, जास्तीत जास्त सभागृहात बाजू मांडणे हे लोकशाहीच्या दृष्टीने हिताचे आहे. सभागृहात आमदारांनी मांडलेला मुद्दा हा रेकॉर्डवर घेतला जातो. त्यामुळे एखाद्या आमदारांने अभ्यासपूर्ण केलेले भाषण हा पुढील काळात संदर्भ म्हणून वापरला जाऊ शकतो, याचे भान प्रत्येक आमदारांनी ठेवायला हवे.

# जनता पार्टी आणीबाणीनंतर...



इंदिरा गांधींनी २५ जून १९७५ ते मार्च १९७७ या काळात देशावर लादलेल्या आणीबाणीत तब्बल एकवीस महिने विरोधी पक्षांचे दिग्गज नेते व लक्षावधी प्रमुख कार्यकर्ते जेलमध्ये होते. याच काळात इंदिरा गांधींना सत्तेवरून हटविण्यासाठी सर्व विरोधी पक्षांनी एकत्र येऊन निवडणुका लढवल्या पाहिजेत यावर सर्व नेत्यांमध्ये मतैक्य झाले. वेगवेगळ्या विचारसरणीचे आणि वेगवेगळा अजेंडा असणारे राजकीय पक्ष आणीबाणी उठल्यानंतर काँग्रेसच्या विरोधात निवडणूक लढविण्यासाठी एकत्र आले. काँग्रेसचा पराभव करणे हे एकमेव उद्दिष्ट विरोधी पक्षांकडे होते. त्यातूनच लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या आशीर्वादातून जनता पार्टीचा उदय झाला. आणीबाणीनंतर झालेल्या १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाला आणि केंद्रात जनता पार्टीचे सरकार स्थापन झाले. मोरारजी देसाई यांनी बिगर काँग्रेसचे पहिले पंतप्रधान म्हणून शपथ घेतली, पण चार मोठे राजकीय पक्ष एकत्र येऊन स्थापन झालेल्या जनता पार्टीचे सरकार फार काळ टिकले नाही. सतत हेवे-दावे, आरोप-प्रत्यारोप, समाजवादी विरुद्ध जनसंघ अशा संघर्षानेच जनता पार्टीचा घात केला. जनसंघाने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंध ठेवायचे नाहीत, यासाठी समाजवादी हट्टाला पेटली होती, तर आमची मातृसंस्था असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला आम्ही कदापि दूर करू शकत नाही, अशी ठाम भूमिका जनसंघाची होती. याच वादातून जनता पार्टीला मोठे तडे गेले.

जनता पार्टी सरकारला केंद्रात पाच वर्षांची टर्मही पूर्ण करता आली नाही आणि १९८० मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत पुन्हा सत्ताही मिळवता आली नाही. काँग्रेसला पर्याय म्हणून निर्माण झालेल्या जनता पार्टीचे व नंतर जनता दलाचे पुढे अनेक तुकडे पडले. स्वातंत्र्यानंतर वर्षानुवर्षे केंद्रात व विविध राज्यांत काँग्रेसची सत्ता होती. आणीबाणीपूर्वीही काँग्रेसच्या विरोधात विरोधी पक्षांनी एकत्र येऊन निवडणूक लढविण्याचा प्रयोग केला होता. ओल्ड काँग्रेस (काँग्रेसमधील फुटीर गट), भारतीय जनसंघ, स्वतंत्र पार्टी, समाजवादी पार्टी यांनी १९७१ मध्येही काँग्रेसच्या विरोधात एकत्र येण्याचा प्रयत्न केला होता. पण काँग्रेसच वरचढ ठरली. उत्तर प्रदेशात १९७४ च्या विधानसभा निवडणुकीत विरोधी पक्षांनी काँग्रेसच्या विरोधात संयुक्त आघाडी करून निवडणूक लढवली. पण काँग्रेसचे एच. एन. बहुगुणांनी पुन्हा सत्ता प्राप्त केली. मात्र गुजरातमध्ये विविध विरोधी पक्षांनी एकत्र येऊन जनमोर्चा स्थापन केला व १९७५च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा पराभव करून दाखवला. त्यावेळी गुजरातमध्ये विद्यार्थ्यांचे नवनिर्माण आंदोलन तीव्र होते. या आंदोलनाचा लाभ जनमोर्चाला मिळाला. गुजरातमध्ये विरोधी पक्षाला मिळालेल्या यशानंतर बिहारमध्ये हाच प्रयोग केला गेला. आणीबाणीनंतर गुजरातमधील जनमोर्चाच्या मॉडेलचा आधार आणि जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वातून प्रेरणा घेऊनच जनता पार्टीचा उदय झाला. लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वावर जनतेचा मोठा विश्वास होताच, पण त्यांच्यातील नैतिक सामर्थ्यानेच जनता पार्टीला मोठा जनाधार प्राप्त झाला. दरम्यान अलाहाबाद उच्च न्यायालयाने इंदिरा गांधींवर सत्तेचा गैरवापर करून निवडणूक लढविल्याचा ठपका ठेवला, त्यांना दोषी ठरवले व त्यांची खासदार म्हणून झालेली निवड रद्द केली. या निकालानंतर इंदिराजी आता काय डावपेच लढवणार याची विरोधी पक्षाला मोठी उत्सुकता होती. न्यायालयाच्या निकालानंतर भारतीय लोकदल, भारतीय जनसंघ, ओल्ड काँग्रेस व समाजवादी पार्टीच्या प्रमुख नेत्यांची दिल्लीत बैठक झाली. विरोधी पक्षांनी एकत्र येऊन एकच मोठा पक्ष स्थापन करावा असे चरणसिंग यांना वाटत होते, तर जनसंघाच्या नेत्यांना पक्षांचे विलीनीकरण मान्य नव्हते. गुजरात मॉडेल जनमोर्चा प्रमाणेच राष्ट्रीय पातळीवर आघाडी स्थापन करावी अशी भूमिका मोरारजी देसाई यांनी मांडली. समाजवादी नेते जॉर्ज फर्नांडिस यांनी मात्र राजकीय पक्षांचे विलीनीकरण झाले तरी वेगवेगळ्या विचारधारांचे विलीनीकरण कसे होणार, असा प्रश्न उपस्थित केला. भारतीय लोकदल, जनसंघ,



## इंडिया कॉलिंग

**डॉ. सुकृत खांडेकर**

ओल्ड काँग्रेस, स्वतंत्र पार्टी, संयुक्त सोशलिस्ट पार्टी, उत्कल काँग्रेस या पक्षांनी एकत्र येऊन जनता पार्टीची स्थापना केली. शेतकरी नेते चरणसिंग यांनी ऑगस्ट १९७४ मध्ये त्यांचा पक्ष भारतीय क्रांती दल, स्वतंत्र पार्टी, संयुक्त सोशलिस्ट पार्टी व उत्कल काँग्रेस या चार पक्षांच्या विलीनीकरणानंतर भारतीय लोकदलाची स्थापना केली.

स्वतंत्र पक्षाची स्थापना सी. राजगोपालचारी यांनी केली होती. संयुक्त सोशलिस्ट पार्टीचे नेते म्हणून राम मनोहर लोहिया ओळखले जायचे. उत्कल काँग्रेसचे नेते बिजू पटनाईक होते. काँग्रेस पक्षात १९६९ मध्ये फूट पडल्यावर काँग्रेस ओल्ड व काँग्रेस आर असे दोन गट झाले. काँग्रेस आरचे नेतृत्व जरी जगजीवन राम यांच्याकडे असले तरी त्या पक्षावर संपूर्ण नियंत्रण इंदिरा गांधींचे होते. काँग्रेस ओल्डचे नेतृत्व एस. निजलिंगप्पा यांच्याकडे होते. काँग्रेस ओल्डमध्ये जुने व स्वातंत्र्य आंदोलनात भाग घेतलेले नेते होते. पंडित नेहरूंनंतर मोराराजी देसाई पंतप्रधान होतील असे सर्वांना वाटले होते, पण इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्याने मोरारजी होऊ शकले नाहीत. पुढे इंदिरा गांधींच्या सरकारमध्ये उपपंतप्रधान म्हणून काम करावे लागले. भारतीय जनसंघाची स्थापना १९५१ मध्ये झाली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची राजकीय आघाडी म्हणून जनसंघाची ओळख होती. ज्यावेळी जनसंघ जनता पार्टीत विलिन झाली तेव्हा लालकृष्ण अडवाणी हे पक्षाचे प्रमुख होते.

जनसंघाचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंध आहे म्हणून समाजवाद्यांचा मोठा आक्षेप होता. सोशलिस्ट पार्टीचे नेतृत्व जॉर्ज फर्नांडिस यांच्याकडे होते. सोशलिस्ट पक्षात अनेक वेळा फूट पडली. १९७७ मध्ये निवडणुका जाहीर झाल्यानंतर काँग्रेस फॉर डेमॉक्रसी हा काँग्रेसमधील फुटिरांनी स्थापन केला. आणीबाणीचा फटका काँग्रेसमधील काही बड्या नेत्यांनाही बसला. या काळात एच. एन. बहुगुणा (उत्तर प्रदेश), नंदिनी सत्पथी (ओडिसा) यांना पक्षाने मुख्यमंत्रीपदावरून हटवले. त्यांनीच काँग्रेस फॉर डेमॉक्रसीची स्थापना केली व तो गट जनता पार्टीत सामील झाला. तेव्हा जनता पार्टीचे नेतृत्व ८१ वर्षांच्या मोरारजी देसाईंकडे होते. जनता पार्टीने १९७७ ची लोकसभा निवडणूक लढवली पण निवडणूक आयोगाकडे नोंदणीचे उपचार पूर्ण न झाल्यामुळे जनता पार्टीला भारतीय लोकदलाच्या निवडणूक चिन्हावर निवडणूक लढवावी लागली. तसेच जनता पार्टीने तामिळनाडूत ओल्ड काँग्रेसच्या चिन्हावर निवडणूक लढवली. जनता पार्टीने लोकसभेच्या ५४२ पैकी २९८ जागा जिंकल्या. भारतीय जनसंघाचे सर्वाधिक म्हणजे ९३ मतदारसंघांत खासदार निवडून आले. भारतीय लोकदलाचे ७१, ओल्ड काँग्रेसचे ५१, सोशलिस्ट पार्टीचे २८, काँग्रेस फॉर डेमॉक्रसीचे २८ खासदार निवडून आले. २४ मार्च १९७७ रोजी मोरारजी देसाई यांनी पंतप्रधानपदाची शपथ घेतली. जनता पार्टीच्या सरकारमध्ये चरणसिंग हे केंद्रीय गृहमंत्री होते. पंतप्रधानपद मिळाले नाही म्हणून ते नाराज होते. त्यातून सत्ताधारी पक्षात ताणतणाव वाढत गेला. १ जुलै १९७८ रोजी मोरारजी देसाई यांनी चरणसिंग यांना सरकारमधून हटवले. पण एक महिन्यानंतर चरणसिंग हे उपपंतप्रधान म्हणून परतले. तरीही चरणसिंग हे समाधानी नव्हते. १६ जुलै १९७९ रोजी राजीनामा देऊन सरकारमधून ते बाहेर पडले आणि जनता दल सेक्युलर नावाचा नवीन पक्ष स्थापन केला. पुढे काही दिवसांतच काँग्रेस पक्षाचा पाठिंबा घेऊन ते पंतप्रधान झाले. त्यांचे सरकार महिनाभरही टिकले नाही, विश्वासदर्शक ठरावाला सामोरे जाण्याअगोदरच त्यांनी राजीनामा दिला. जनता पार्टीचे सरकार स्थापन होऊन वर्षही झाले नसताना समाजवादी नेते मधू लिमये यांनी जनसंघावर दुहेरी सदस्याचा आरोप करून त्याला आक्षेप घेतला. दि. २ सप्टेंबर १९७९ रोजी जनता पार्टीची राष्ट्रीय कार्यकारिणी झाली. त्यात दुहेरी सदस्यत्वावर चर्चा झाली. निवडून आलेल्या आमदार-खासदारांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमात भाग घेण्यास मनाई करावी, असे चंद्रशेखर यांनी संघाच्या नेत्यांना सुचवले. दि. १९ मार्च १९८० रोजी जनता पार्टीच्या संसदीय मंडळाची बैठक झाली व पदाधिकाऱ्यांनी संघाच्या कार्यक्रमात सहभागी होऊ नये, असा निर्णय घेतला. केवळ पंधरा दिवसांनंतरच, दि. ६ एप्रिल १९८० रोजी भारतीय जनसंघाने पक्षाचे अध्यक्ष म्हणून अटलबिहारी वाजपेयी यांच्या नावाची घोषणा केली.

आपलाच पक्ष खरी जनता पार्टी आहे, असा दावाही जनसंघाने निवडणूक आयोगाकडे केला. पुरावा म्हणून आपल्या पक्षाच्या खासदारांच्या नावाची यादी जोडली. दि. २४ एप्रिल रोजी या पक्षाला निवडणूक आयोगाने राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता दिली व पुढे भारतीय जनता पक्ष उदयाला आला. मार्च १९८० मध्ये जनता पार्टी (एस)चे चरणसिंग यांनी आपल्या पक्षाचे नामकरण लोकदल करावे अशी मागणी निवडणूक आयोगाकडे केली, पण इंदिरा गांधींचा निवडणुकीत पराभव करणारे दिग्गज नेते राज नारायण यांनी त्याला आक्षेप घेतला. निवडणूक आयोगाने जनता पार्टी एस (चरणसिंग) व जनता पार्टी एस (राजनारायण) असा तोडगा दिला. कालांतराने चरणसिंग यांनी आपल्या पक्षाचे नामकरण लोकदल केले. जनता पार्टीचे अध्यक्ष चंद्रशेखर यांनी दि. २९ एप्रिल १९८० रोजी पक्षाला राष्ट्रीय मान्यता मिळावी म्हणून सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली, पण दुसऱ्याच दिवशी निवडणूक आयोगाने त्यांच्या मागणीला होकार दर्शवला. १९८० मध्ये जनता पार्टी सेक्युलर पक्ष लोकदलात विलिन झाला. नंतर लोकदल हा जनता दलात विलिन झाला. १९८९-९१ या काळात जनता दलाचे केंद्रात सरकार राहिले. नंतर जनता पार्टीप्रमाणेच जनता दलाचे तुकडे पडले. सोशलिस्ट समता पार्टी, समाजवादी जनता पार्टी (राष्ट्रीय), राष्ट्रीय जनता दल, बिजू जनता दल, राष्ट्रीय लोकदल, जनता दल युनायटेड, जनता दल सेक्युलर असे अनेक तुकडे पडले.

sukritforyou@gmail.com
sukrit@prahaar.co.in

# ‘ती’ ला घटस्फोटापेक्षा मरण सोपे वाटते

दोषारोप आणि अपराधीपणाची भावना महिलांना आतल्या आत खात राहते. अनेकदा पीडित महिलेलाच दोषी ठरवले जाते. ‘तूच नीट वागत नाहीस’, 'तुझ्यामुळेच हे सर्व होत आहे' अशा बोलण्यामुळे ती स्वत:लाच या परिस्थितीसाठी जबाबदार धरू लागते. सामाजिक कलंक आणि घटस्फोटाची भीती हे एक गंभीर कारण विवाहितांच्या आत्महत्या करण्यामागे आहे. समाजात घटस्फोटित महिलेकडे बघण्याचा दृष्टिकोन अनेकदा नकारात्मक असतो. त्यामुळे अनेक महिला सर्व त्रास सहन करतात आणि आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय घेतात, कारण त्यांना घटस्फोटापेक्षा मरण सोपे वाटते.



हुंड्यामुळे होणाऱ्या त्रासातून विवाहित महिला आत्महत्या का करतात? यामागील मानसशास्त्रीय कारणे पाहिली तर लक्षात येते की, असह्यता आणि निराशा. सततचा शारीरिक आणि मानसिक छळ सहन केल्याने तिला असे वाटू लागते की या परिस्थितीतून बाहेर पडण्याचा कोणताही मार्ग नाही. तिला आपले दुःख कोणाला सांगावे हे कळत नाही. आत्मसन्मानाची हानी झाल्यामुळे 'ती' स्वतःवरील आत्मविश्वास गमावून बसते. सततच्या टोमण्यांमुळे, अपमानामुळे, मारहाणीमुळे महिलेचा आत्मसन्मान पूर्णपणे खच्ची होतो. तिला स्वतःबद्दल अत्यंत नकारात्मक भावना येऊ लागतात. भीती, चिंता याने महिलेचे जीवन व्यापून जाते. तिला सतत भीती वाटत राहते की पुढे काय होईल, आणखी किती त्रास सहन करावा लागेल. ही चिंता तिच्या शारीरिक तसेच मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम करते.

हुंड्यासाठी सासरी छळ होत असेल तर महिलांनी काय उपाययोजना कराव्यात? याबद्दल जाणून घेणे आज काळाची गरज आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्वतःवरचा विश्वास ढळू न देणे. तुम्ही कोणत्याही चुकीसाठी जबाबदार नाही आहात, हे लक्षात ठेवा, स्वतःला वारंवार हे सांगत राहा. संवाद साधणे अत्यंत गरजेचे आहे. सर्वात आधी आपल्या पतीशी, सासरच्या लोकांशी बोलण्याचा प्रयत्न करा. त्यांना होत असलेला त्रास सांगा, माहेरच्यांना माहिती द्या किंवा जवळच्या नातेवाइकांना आणि मित्र-मैत्रिणींशी बोला. त्यांचा आधार घ्या त्यामध्ये कोणताही कमीपणा मानू नका. जर तुम्हाला शारीरिक किंवा मानसिक त्रास दिला जात असेल, तर त्याचे पुरावे (फोटो, व्हिडीओ, ऑडिओ रेकॉर्डिंग, मेसेजेस इ.) गोळा करण्याचा प्रयत्न करा. हे कायदेशीर लढाईत महत्त्वाचे ठरू शकतात. पोलिसांची मदत घ्यायला घाबरू नका. त्रास असह्य झाल्यास जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये जाऊन तक्रार दाखल करा. तुम्ही महिला मदत कक्षाची सुद्धा मदत घेऊ शकता. वकिलाचा सल्ला घेऊन कायदेशीर कारवाई करा,



## फॅमिली काऊन्सलिंग

**मीनाक्षी जगदाळे**

कायद्याची मदत घेतल्यास आपला संसार तुटेल, मोडेल या भावनिक गुंत्यातून बाहेर या. हुंडा प्रतिबंधक कायद्यांतर्गत तुम्ही दाद मागू शकता, या कायद्याची माहिती करून घ्या. समुपदेशन मानसिक त्रासातून बाहेर पडण्यासाठी समुपदेशकाची मदत घेणे खूप महत्त्वाचे असते. अनेकदा नातेवाईक अर्धवट, चुकीचे सल्ले देतात आणि महिलांना अजून गोंधळून जायला होतं. समुपदेशनामुळे तुम्हाला भावनिक आधार मिळेल आणि योग्य निर्णय घेण्यास मदत होईल.

सर्व परिस्थितीचा अचूक अभ्यास करून केलेले मार्गदर्शन समुपदेशनातून मिळाल्यामुळे निर्णय घेऊन अंमलबजावणी करणे सोपे जाईल. स्वतःला आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्याचा प्रयत्न करा. आपण घेतलेल्या शिक्षणाचा वापर करून लवकरात लवकर आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होण्याचा प्रयत्न करा. नोकरी किंवा व्यवसाय करून स्वतःच्या पायावर उभे राहा. यामुळे तुमचा आत्मविश्वास वाढेल. सामाजिक प्रतिष्ठा मिळून तुमची स्वतःची ओळख निर्माण व्हायला मदत होईल. सामाजिक संस्थांची मदत घेणे सुद्धा अशा महिलांना फायदेशीर ठरते. अनेक अशासकीय संस्था (एनजीओ) महिलांच्या हक्कांसाठी काम करतात. तुम्ही अशा संस्थांशी संपर्क साधून त्यांची मदत घेऊ शकता. हुंडाविरोधी कायदे समजावून घ्या, त्याचा अभ्यास करा. भारतात हुंडा देणे आणि घेणे हा कायद्याने गुन्हा आहे. यासाठी प्रमुख कायदे अस्तित्वात आहेत. हुंडा प्रतिबंधक कायदा, १९६१ या कायद्यानुसार हुंडा देणे किंवा घेणे, तसेच हुंड्याची मागणी करणे किंवा त्यासाठी प्रोत्साहन देणे हा गुन्हा आहे. या गुन्ह्यासाठी कमीत कमी ५ वर्षांचा कारावास आणि १५,००० रुपये किंवा हुंड्याच्या रकमेइतका दंड होऊ शकतो. हुंडा मागणाऱ्या व्यक्तीला ६ महिने ते २ वर्षांपर्यंत कारावास आणि १०,००० रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो. या कायद्याअंतर्गत गुन्हा दखलपात्र, अजामीनपात्र आणि तडजोड न होणारा आहे. भारतीय दंड संहिता अंतर्गत कलमे देखील महिलांच्या सुरक्षेसाठी अस्तित्वात आहेत.

कलम ४९८-अ पती किंवा पतीच्या नातेवाइकांकडून महिलेचा हुंड्यासाठी छळ करणे हा गुन्हा आहे. यासाठी ३ वर्षांपर्यंत कारावास आणि दंड होऊ शकतो. हा गुन्हा दखलपात्र आणि अजामीनपात्र आहे. कलम ३०४-ब हुंडाबळी लग्नानंतर सात वर्षांच्या आत जर महिलेचा संशयास्पद परिस्थितीत मृत्यू झाला आणि मृत्यूच्या काही काळ आधी तिचा हुंड्यासाठी छळ झाला असेल, तर तो हुंडाबळी मानला जातो. यासाठी कमीत कमी ७ वर्षे आणि जास्तीत जास्त जन्मठेपेची शिक्षा होऊ शकते. हा गुन्हा दखलपात्र आणि अजामीनपात्र आहे. लग्नात तिला मिळालेल्या वस्तू आणि दागिने तिच्या सासरच्यांनी परत न केल्यास गुन्हा दाखल होऊ शकतो. यासाठी ३ वर्षांपर्यंत कारावास किंवा दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ हा कायदा केवळ शारीरिकच नाही, तर मानसिक, भावनिक, लैंगिक आणि आर्थिक छळापासूनही महिलांना संरक्षण देतो. या कायद्यांतर्गत पीडित महिला संरक्षण आदेश, निवास आदेश, आर्थिक मदत, मुलांचा ताबा आणि नुकसान भरपाई मागू शकते. महिलांनी लक्षात ठेवण्यासारख्या काही महत्त्वाच्या गोष्टी जाणून घ्या. गप्प राहून सहन करत बसू नका. तुमच्यासोबत काही चुकीचे घडत असेल तर त्याबद्दल बोला. स्वतःला दोष देऊ नका. हुंड्याची मागणी करणे किंवा त्यासाठी छळ करणे हे चुकीचे आहे, तुम्ही चुकीच्या नाही. शक्यतो लग्नाआधीच संबंधित कायद्याची माहिती घ्या. तुमच्या हक्कांसाठी आणि संरक्षणासाठी असलेल्या कायद्यांची माहिती, त्या संदर्भात मदत करू शकणारे विश्वासातील मार्गदर्शक यांच्या संपर्कात राहण्याचा प्रयत्न करा. हुंडा ही एक सामाजिक कीड आहे आणि ती नष्ट करण्यासाठी समाजातील प्रत्येकाने पुढाकार घेणे गरजेचे आहे. कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसोबतच जनजागृती आणि मानसिकतेत बदल घडवणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

meenonline@gmail.com

## राशिभविष्य

बुधवार, २ जुलै २०२५

### ॥ पंचांग ॥

आज मिती आषाढ शुद्ध सप्तमी ११.५७ पर्यंत नंतर अष्टमी शके १९४७, चंद्रनक्षत्र उत्तरा फाल्गुनी. योग वरियान. चंद्र रास कन्या, भारतीय सौर ११ आषाढ शके १९४७, बुधवार, दि. २ जुलै २०२५. मुंबईचा सूर्योदय ६.०४, मुंबईचा सूर्यास्त ७.२०, चंद्रोदय १२.१६, मुंबईचा चंद्रास्त ००.२२ उद्याची राहू काळ १२.४२ ते २.२१.बुधाष्टमी, शुभदिवस-सकाळी-११.५८ पर्यन्त.

### ॥ भविष्य ॥

**मेष :** प्रवासाची शक्यता आहे.

**वृषभ :** नोकरीमध्ये उन्नती होणार आहे.

**मिथुन :** आज आपण सर्व ठिकाणी सबुरीने वागणे चांगले आहे.

**कर्क :** नोकरीत नवीन शिकण्याची संधी मिळेल.

**सिंह :** आपणास यश मिळणार आहे.

**कन्या :** जोडीदाराशी वाद घालू नका.

**तूळ :** मनातील दडपण काढून टाका.

**वृश्चिक :** दिवस अनुकूल आहे.

**धनू :** मनात सकारात्मक आणि आनंदी विचार असणार आहेत.

**मकर :** कोणताही निर्णय अविचाराने घेऊ नका.

**कुंभ :** कोणताही एखादा निर्णय पटकन घेऊ नका.

**मीन :** नोकरी-व्यवसायात चांगली स्थिती राहणार आहे.

## जनसंवाद

### मतदारांनी जी. आर. बदलला तर ?

दोन्ही ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्यावर मी असा जीआर काढला नाही अशी खोचक टीका करताना एक गोष्ट जनतेला जाणवली की, मुख्यमंत्री खोचक बोलण्यात पटाईत असल्यामुळे मुख्यमंत्र्यांच्या जवळच्यांनी खोचक बोलण्याबाबतीत टीका करू नये. राहता राहिला जीआरचा प्रश्न म्हणजे शासन निर्णय पण मतदारांच्या दृष्टीने विचार केला तर राज्यातील नेते विकासापेक्षा जर बोलघेवडेपणात वेळ घालवीत असतील तर विद्यमान सरकार आणि यापुढे येणारे कुठल्याही सरकारला मतदार जीआरचा दणका देतील. त्यामुळे विद्यमान सरकार आणि पुढे कुठल्याही पक्षाच्या सरकारने राज्याच्या आणि जनतेच्या समस्यांकडे लक्ष द्या अशी भावना राज्यातील जनतेची आहे, तिचा आदर राखा.

– **अरुण बधान,** डोंबिवली

### गुरुपौर्णिमेचे महत्व

गुरुपौर्णिमा हा उत्सव आषाढ पौर्णिमा या दिवशी साजरा केला जातो. यावर्षी गुरुपौर्णिमा १० जुलैला आहे. ईश्वराचे सगुण रूप म्हणजे गुरू आणि गुरूंचे निर्गुण रूप म्हणजे ईश्वर. गुरू याचा अर्थ, गु म्हणजे अंधकार आणि रू म्हणजे अंतःकाराला दूर करणारा, प्रकाशाकडे घेऊन जाणारा. गुरू नेहमी देवतुल्य मानले जातात. गुरू म्हणजे शिष्याला मोहजालातून अलगदपणे बाहेर काढून त्याच्याकडून, त्याच्या प्रकृतीनुसार साधना करून घेणारे. महर्षी व्यासांना सर्वश्रेष्ठ गुरू मानले जाते. आषाढ पौर्णिमेला व्यासांच्या शिष्यांनी पहिल्यांदा गुरू पूजन केले म्हणून त्याला व्यासपौर्णिमा म्हणतात. आपल्या आयुष्यात योग्य वेळी, योग्य गुरू आले तरच आपले जीवन योग्य मार्गाने जाऊन ध्येय प्राप्ती निश्चित होते. मात्र त्यासाठी आपली पात्रता ही तेवढीच असावी लागते. जन्मदाते आई-वडील पंख देतात. पण त्या पंखांना भरारी मारण्याच बळ मात्र गुरूच देतात. आपल्याला असणारी संसारिक आसक्ती ही साधनेनेच कमी होते. अशा गुरूंविषयी कृतज्ञता म्हणून या दिवशी शिष्य, गुरूंची 'पाद्य पूजा' करतात आणि त्यांना मनोभावे गुरुदक्षिणा अर्पण करतात.

– **माधवी पत्की,** नागपूर

### गुरुतत्व एक सहस्त्र पटीने कार्यरत असते

गुरुपौर्णिमे दिवशी गुरुतत्त्व एक सहस्त्र पटीने कार्यरत असते. सर्वांनाच ते तत्त्व आपणास मिळाले असे वाटत असते. ते तत्त्व आपणास मिळण्यासाठी आपण तन-मन-धन अर्पण करूया व गुरुतत्त्वाचा लाभ करून घेऊया. तन-मन-धन याचा आपण त्याग करूया. मनाचा त्याग करणे म्हणजे नामजप करणे होय. आपल्या मनाची एकाग्रता वाढते. एकाग्र मनाने नामस्मरण केले की आपले मनोबल वाढून मानसिक तणाव कमी होतो. तन म्हणजे शरीर गुरुपौर्णिमे अंतर्गत ज्या काही शारीरिक सेवा आहे त्या सेवा केल्या की आपल्या तनाचा त्याग होतो. धनाचा त्याग आपण सहजपणे करू शकतो. गुरुपौर्णिमे अंतर्गत आपण संकल्प करूया व तन मन धनाचा त्याग करून गुरुतत्त्व अनुभवयात.

– **नलिनी सूर्यवंशी,** कराड

### जम्मू-काश्मीरमधील दहशतवाद

जम्मू-काश्मीरमधील दहशतवाद हा ‘न्याय संघर्ष’ असल्याचे अजब तर्कट पाकिस्तानचे लष्करप्रमुख असे मुनीर यांनी मांडले. पाकला भारताने युद्धात अनेकदा हरवूनही पाक तोच मुद्दा दोन देशांदरम्यान मांडत आहे. याउलट पाकव्याप्त काश्मीर पीओके हा भारताचा 'न्याय संघर्ष' असून मुनीर ते सोडायला कदापि राजी होणार नाही. काश्मीर घेण्याचा इतका अट्टहास पाहता ते जर खरोखर पाकिस्तानला मिळाले तर पुढील शंभर वर्षांत पाक तेथे भारताची एकही खूण ठेवणार नाही. प्रदेश जिहादी आणि घुसखोरांनी भरून जाईल. जसे आज तिबेटमध्ये चीन तिबेटची ओळख पुसून टाकत आहे. यासाठी काश्मीरमधून भीतीने पळून गेलेल्या काश्मिरी पंडितांचे पुनर्वसन करणे, दहशतवाद्यांची खोऱ्यातून हकालपट्टी करणे आणि सुरक्षा राखणे आवश्यक ठरते.

– **गिरीश भागवत,** यशवंत नगर

### महिला व मुलींच्या सुरक्षेसाठी...

महाराष्ट्रातील महिला व मुलींच्या सुरक्षेसाठी त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचारांच्या तक्रारींवर प्रभावीपणे कारवाई करण्यासाठी आंध्र प्रदेशच्या धर्तीवर महाराष्ट्रात 'शक्ती' कायद्याचा मसुदा तयार केला व त्याला २०२० मध्येच राज्य सरकारची मंजुरी मिळाली होती. असे असताना केंद्राकडे अंतिम मंजुरीसाठी हा प्रस्ताव पडून असून या कायद्याला काही त्रुटींमुळे अंतिम स्वरूप प्राप्त झाले नाही, असे कळत. राज्य शासनाने महिला, मुलींवर होणारे अत्याचार थांबविण्यासाठीचे गांभीर्य ओळखून त्रुटी दूर करण्यासाठी स्थापण्यात आलेल्या समितीला अंतिम मुदत द्यावी आणि या कायद्याच्या अंमलबजावणी करण्याप्रकरणी उर्वरित कार्यवाहीसाठी कुठलेही राजकारण मध्ये न आणता केंद्राकडे पाठपुरावा करावा!

– **चंद्रशेखर दाभोळकर,**भांडुप

### गुरूंना अपेक्षित असलेले कार्य

लोक धर्माचरण करत नसल्याने दुष्प्रवृत्ती बळावल्या आहेत. भ्रष्टाचार, अत्याचार, अनैतिकता इत्यादींनी परिसीमा गाठली. हिंदू धर्म, धर्मग्रंथ, देवता, संत, गोमाता, गंगा इत्यादींचा अनादर केला जात आहे. चाणक्य-चंद्रगुप्त, समर्थ रामदास्वामी-छत्रपती शिवाजी महाराज इत्यादी गुरू-शिष्यांनी धर्मसंस्थापनेचे ऐतिहासिक कार्य केले. गुरुपौर्णिमा म्हणजे गुरुंप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस. गुरुपौर्णिमेला गुरूप्रती एक दिवसाची कृतज्ञता व्यक्त करण्यापेक्षा गुरूंना अपेक्षित असलेले कार्य वर्षभर करत राहाणे, हीच खरी कृतज्ञता ठरते.

– **अपर्णा जगताप**, मुंबई

### इस्त्रायल-इराण युद्ध

इस्त्रायल इराण युद्ध जगभरात याचे दुष्परिणाम दिसत असताना भारताने यात मध्यस्थी करावी यासंदर्भात पावले उचलली जावीत. अन्यथा इंधन दरवाढ, वाढती महागाई, टंचाई, मंदीची धास्ती यामुळे आपल्यावरही कठीण परिस्थिती येण्याची शक्यता नाकारता येत नाही. कुठेही युद्ध सुरू असेल तर त्याचे विपरीत परिणाम होतात त्यामुळे शांतता महत्त्वाची असते. युद्ध म्हणजे समस्येत मोठी वाढ असते.

– **प्र.मु.काळे**,नाशिक

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com



## ज्येष्ठ नागरिकांना मोफत छत्री वाटप

**कल्याण :** महाराष्ट्र राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कल्याण लोकसभेचे खासदार माननीय श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली माजी नगरसेविका सुरेखा पाटील व रमेश पाटील यांच्यातर्फे खारीगाव पारसिक शिवसेना शाखेमध्ये कल्याण जिल्हा प्रमुख माननीय गोपाळजी लांडगे यांच्या हस्ते दिनांक २९ रोजी ज्येष्ठ नागरिकांना छत्री वाटप करण्यात आले. याप्रसंगी ज्येष्ठ नगरसेवक उमेश पाटील, नगरसेविका मनालीताई पाटील, शहर प्रमुख नरेंद्र शिंदे, उपशहर प्रमुख नथू पाटील, खारीगाव पारसिक विभाग प्रमुख माननीय नगरसेवक श्याम पाटील, उपविभाग प्रमुख अरविंद कापडी, बळीराम घाग, शाखाप्रमुख राजे वराडकर, शेखर सावंत, रोहन शिंदे, माजी शाखा प्रमुख नंदू पाटील, दिनेश बने, चेतन पाटील समस्त शिवसैनिक पदाधिकारी महिला आघाडी कार्यक्रमात उपस्थित होते.

# कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत महायुतीचा झेंडा

### १८ जागांपैकी १५ जागांवर महायुती विजयी, २ महाविकास आघाडी, तर १ अपक्ष

◆ **डोंबिवली (वार्ताहर) :**

कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीत बाजार समितीवर महायुतीचा झेंडा फडकला असून एकूण १८ जागांपैकी १५ जागा महायुतीच्या कोट्यात पडल्या असून २ जागांवर महाविकास आघाडी तर एक जागा अपक्ष उमेदवाराला मिळाली असल्यामुळे कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीवर मतदात्यांनी महायुतीला एक हाती सत्ता देऊन आपला विश्वास दाखविला.

कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीचा निकाल शनिवारी रात्री उशिरापर्यंत जाहीर करण्यात आला. निवडणुकीत



पार पडलेल्या मतदान प्रक्रियेला मतदारांनी भरभरून प्रतिसाद दिला. शनिवारी सकाळी सात वाजता मतदानासाठी मोठी गर्दी केली होती. तर सायंकाळी पाचपर्यंत मतदानाचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून एकूण मतदानाच्या ९०.३७ टक्के मतदानाची नोंद करण्यात आली. कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीत २३५८ मतदारांपैकी तब्बल २१३१ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला, यामध्ये महिलांचा सहभागही लक्षणीय होता. कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या १८ जागांपैकी एकूण १७ जागांसाठी हे मतदान झाले असून एक उमेदवार बिनविरोध निवडून आला. कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत १५५ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यापैकी १५ अर्ज बाद असून प्रत्यक्षात निवडणुकीच्या रिंगणात ५१ उमेदवारांनी आपले नशीब आजमावले होते.

या निवडणुकीत विजयी उमेदवार रवींद्र घोडविंदे, कपिल थळे, भरत गोंधळे, योगेश धुमाळ, अरुण पाटील, जालिंदर पाटील, मनोहर पाटील, विद्या पाटील, शारदा पाटील, वसंत लोणे, रवींद्र आव्हाड, नरेश सुरोशी, रवींद्र भोईर, किशोर वाडेकर, विजय सुरोशी, काशिनाथ नरवडे आणि गिरीश पाटील हे उमेदवार प्रत्यक्षात निवडणूक लढवून जिंकले असून हमाल व तोलाई गटातील शंकर आव्हाड हे बिनविरोध निवडून आले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी विशाल जाधव यांनी दिली.

### चित्ररथाद्वारे व्यापक स्वरूपात जनजागृती

## दिंडी सजगतेची, आपत्ती व्यवस्थापनाची संकल्पना लक्षवेधी

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

पंढरपूर आषाढी वारी ही महाराष्ट्राची धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक एकतेची शान असलेली परंपरा आहे. याच पवित्र वारीत राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने एक अभिनव आणि स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे – 'दिंडी सजगतेची – आपत्ती व्यवस्थापनाची'. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार आणि आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली, राज्य शासनाने या उपक्रमाच्या माध्यमातून वारीमध्ये सहभागी लाखो वारकऱ्यांमध्ये आपत्ती विषयक सजगता निर्माण करण्याचे महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.

वारीमध्ये आकर्षक पद्धतीने सजवलेले चित्ररथ, पथनाट्य पथक, माहितीपूर्ण स्टॉल्स, मोबाईल व्हॅन आणि जनतेस सुलभ भाषेतील माहितीपत्रके वापरून पूर, चक्रीवादळ, दुष्काळ, गर्दी नियंत्रण यासारख्या आपत्तींविषयी माहिती दिली जात आहे. "संकटाला घाबरू नका, सज्ज राहा" असा सकारात्मक संदेश देत ही दिंडी वारकऱ्यांचे लक्ष वेधून घेत आहे. दिनांक १९ जून पासून वारी बरोबर प्रारंभ झालेल्या या संकल्पनेसाठी ४ चित्ररथ असून ६० लोकांची टीम यामध्ये सहभागी झाली आहे. दिनांक ६ जुलै आषाढी एकादशीपर्यंत या चित्ररथाद्वारे व्यापक स्वरूपात जनजागृती करणार आहे.

चित्ररथावर विठ्ठल-रखुमाईंची छायाचित्रे, वारकरी परंपरेचे दर्शन, तसेच आपत्ती व्यवस्थापनाच्या विविध उपाययोजनांचे चित्ररूप दर्शन घडते. यामुळे ही संकल्पना अध्यात्मिक श्रद्धेच्या सोबतीने सुरक्षिततेची जाणीव देखील देत आहे. वारीत ज्ञानेश्वर माऊली आणि संत तुकाराम महाराज यांच्या दोन प्रमुख पालख्यांच्या मागोमाग गावागावातील लहान-मोठ्या दिंड्या सहभागी होत असतात. ही संपूर्ण वारी जिथे भक्तिभाव, कीर्तन, रिंगण, अभंग गजरात रंगलेली असते, तिथेच ही "दिंडी सजगतेची" आपत्ती व्यवस्थापनाची माहिती घेऊन शांतपणे आपले कार्य करत आहे. वारकऱ्यांनी या चित्ररथांचे आणि माहिती स्टॉल्सचे स्वागत केले असून, "सजग व सुरक्षित वारी" ही संकल्पना सर्वांच्या मनात घर करत आहे. राज्य शासनाचा हा उपक्रम म्हणजे आपत्ती व्यवस्थापन आणि जनतेच्या सहभागाचा उत्कृष्ट संगम आहे. लाखो वारकऱ्यांचे या निमित्ताने आपत्ती व्यवस्थापन बाबत प्रबोधन होत आहे.

## दहावीत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

छत्रपती शिक्षण मंडळ, ज्ञानमंदिर हायस्कूल, कोळसेवाडी, कल्याण (पूर्व) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करून त्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. शाळेचा इ.१० वी चा एकूण निकाल ८७.८७% निकाल लागल्यानंतर यामध्ये प्रथम द्वितीय तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा देखील येथोचित असा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमासाठी सहयोग फाऊंडेशन या सामाजिक संस्थेकडून मदत करण्यात आली. एसएनडीटी कॉलेजच्या समन्वयक आदिती चौधरी यांच्या हस्ते दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

## वेचक

### यशवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा उत्साहात संपन्न



**ठाणे :** मंथन पब्लिकेशन अहिल्यानगर यांच्या वतीने दरवर्षी घेण्यात येणाऱ्या इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांच्या राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेतील यशवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आनंददायी वातावरणात संपन्न झाला. अगदी कमी वयात गुणवंत विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश संपादन केल्याने त्यांचे सर्व स्तरातून उत्स्फूर्त कौतुक केले जात आहे. या गौरव सोहळ्यात राज्यस्तरीय, जिल्हा-विभाग स्तरीय व केंद्रस्तरीय अशा एकूण ४४४ विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. दरवर्षी अहिल्यानगर येथे संपन्न होणारा गौरव सोहळा यावर्षी पहिल्यांदाच शहापूरच्या वैश्य समाज सभागृहात आयोजित करण्यात आला होता. रमेश वनारसे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या गुणगौरव सोहळ्यासाठी दत्तात्रय पाटील, रामचंद्र कशिवले, गटशिक्षणाधिकारी रामचंद्र विशे, श्रीमती शिवानी पवार, केशव वेखंडे, दत्तात्रय किरपण, अमोल पोतदार, आर. के. पाटील, अरुण पाटील, दत्तात्रय भरोदे, चंद्रकांत बोरसे, एकनाथ वेखंडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या गौरव सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांना नवी प्रेरणा मिळून नवे चैतन्य मिळाल्याची भावना उपस्थित विद्यार्थी आणि पालकांनी व्यक्त केली. या सोहळ्यात २६ राज्यस्तरीय, १२२ जिल्हा- विभाग स्तरीय तर २९६ केंद्रस्तरीय अशा एकूण ४४४ विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

### प्राथमिक शाळेतील विद्यार्थिनींना मोफत लसीकरण

**डोंबिवली :** रोटरी क्लब ऑफ रिजन्सी, डोंबिवली, यांच्यामार्फत राष्ट्रीय शिक्षण संस्था संचलित, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर अरुणोदय शाळेतील विद्यार्थिनींना 'सर्विकल कॅन्सर' विरोधात 'एच. पी. व्ही' लसीकरण कार्यक्रम नुकताच संपन्न झाला. शाळेतील १२ ते १५ वयोगटातील ६१ विद्यार्थिनींना रोटरी क्लब आणि आरोग्य विभागाच्या सहकार्याने सहा महिन्यांपूर्वी सर्विकल कॅन्सर विरोधात मोफत लस देण्यात आलेली होती, त्याचा दुसरा डोस आज शाळेत देण्यात आला. आजच्या धकाधकीच्या जीवनात मुलींमध्ये वाढणारे गर्भाशयाचे कॅन्सरचे प्रमाण पाहता त्याला आळा घालण्यासाठी हे लसीकरण केले जाते. वयात येणाऱ्या मुलींसाठी त्यांचे आरोग्य जपण्यासाठी, सुरक्षित उज्ज्वल भविष्यासाठी शाळेने उचललेले हे पाऊल म्हणजेच रोटरी क्लब ऑफ रीजन्सी यांच्या सहकार्याने केलेला हा स्तुत्य उपक्रम आहे. स्वामी विवेकानंद विद्यामंदिर अरुणोदय प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक नारोळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम शाळेत घेण्यात आला. या लसीकरण मोहिमेत रोटरी क्लबने घेतलेली ही समाजोपयोगी पुढाकाराची भूमिका अत्यंत कौतुकास्पद आहे.

### सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना भिवंडी महानगरपालिकेचा निरोप

**भिवंडी :** महानगरपालिका सेवेतून नियत वयोमानाप्रमाणे ११ कर्मचारी सेवानिवृत्त व स्वेच्छानिवृत्त झाल्याने महापालिकेचे प्रशासक तथा आयुक्त अनमोल सागर (भा. प्र. से) यांनी दिलेल्या निर्देशानुसार महानगरपालिकेतर्फे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना कार्यक्रमाच्या माध्यमातून निरोप देण्यात आला. याप्रसंगी सहा-आयुक्त (आरोग्य) शैलेश दोंद यांच्या शुभ हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला आणि त्यांनी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना त्यांच्या पुढील आयुष्याकरीता शुभेच्छाही दिल्या. महानगरपालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरील स्व. विलासराव देशमुख सभागृहात संपन्न झालेल्या या निरोप समारंभाच्या कार्यक्रमातून प्रकाश सदानंद पाटील (लिपिक तथा प्र. कार्या. अधीक्षक), संतोष आत्माराम ठाकुर (वाहनचालक), वामन केरबा बनसोडे (वाहनचालक), पंजाब रामधन राठोड (वाहनचालक), रोशना शरद मुकादम (बालवाडी शिक्षिका), ललिता व्यंकटेश गुंडला, (बालवाडी मदतनीस), शकील अहमद हरुन मोमीन (थियेटर अटेंडन्ट), कैलास नथुराम घोष्टेकर (सफाई कामगार), अस्मिता आनंद घाडगे (सफाई कामगार), अनंता बाळु जाधव (सफाई कामगार), विष्णू शंकर बेरडिया (सफाई कामगार), अशा ११ सेवानिवृत्त व स्वेच्छानिवृत्त मनपा कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेच्या वतीने नुकतेच निरोप देण्यात आला. या प्रसंगी मनपा अधिकारी व कर्मचारी, सर्व कर्मचारी संघटना प्रतिनिधी, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.

## तेवीस आठवड्यांत जन्मलेल्या बाळाला जीवदान

**भाईंदर :** पूर्णपणे विकसित न झालेल्या अवयवांसह अवघ्या २३ आठवड्यांच्या गर्भावस्थेत जन्मलेल्या बाळाला मीरा रोड येथील वोक्हार्ट रुग्णालयाच्या डॉक्टरांनी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि अथक प्रयत्नाने उपचार करून जीवदान दिले आहे.

अवघ्या २३ आठवड्यांच्या गर्भावस्थेत आणि केवळ ५३० ग्रॅम वजन असलेल्या बाळाचा जन्म वोक्हार्ट रुग्णालयात झाला. आंतरराष्ट्रीय पातळीवरही अशा बाळांच्या जगण्याचे प्रमाण फारच कमी असते. रुग्णालयाच्या स्त्रीरोग तज्ज्ञ नीतू मुंधडा यांनी दिलेल्या माहितीनुसार, ही केस सुरुवातीपासूनच अत्यंत आव्हानात्मक होती.

अशा बाळांना प्रामुख्याने श्वसनाच्या अडचणींना आणि पूर्णपणे विकसित न झालेल्या अवयवांशी संबंधित समस्यांना सामोरे जावे लागते. मात्र सातत्याने घेतलेली काळजी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर तसेच डॉक्टरांच्या अथक प्रयत्नांमुळे आम्ही या बाळाला जीवनाची संधी देऊ शकलो. ११२ दिवस नवजात अतिदक्षता विभागात उपचार घेतल्यानंतर, नियोजित प्रसूतीच्या तारखेलाच १ किलो ६०० ग्रॅम वजनासह बाळाला घरी सोडण्यात आले.

## सुनील झळके यांचा 'समाजरत्न - २०२५' पुरस्काराने गौरव



◆ **बदलापूर (वार्ताहर) :**

सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, साहित्य कला, सहकार पत्रकारिता इ. विविध क्षेत्रांमध्ये शून्यामधून विश्व निर्माण करणाऱ्या व सामाजिक जाणवेतून सतत कार्यरत व्यक्तींचा बदलापूर येथील जनजागृती सेवा संस्था (रजिस्टर) यांच्या वतीने आयोजित केलेल्या पुरस्कार सोहळ्यामध्ये भिवंडीतील सुनील झळके (सेवानिवृत्त, सहाय्यक आयुक्त-शिक्षण व माहिती जनसंपर्क अधिकारी) यांना त्यांच्या कार्याबद्दल संस्थेच्या चतुर्थ वर्धापन दिनाच्या बदलापूर येथे पार पडलेल्या दिमाखदार सोहळ्यामध्ये मान्यवर व्यक्तींच्या उपस्थितीमध्ये, समाजरत्न - २०२५ या पुरस्काराने गौरविण्यात आले. याप्रसंगी विविध क्षेत्रातील, विविध समाजसेवकांनाही पुरस्कार बहाल करण्यात आले.

जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष, गुरुनाथ तिरपणकर यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करून त्यांना गौरविण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष, तिरपणकर यांनी सांगितले की, समाजातील अनेक प्रश्न, समस्यांसाठी निःस्वार्थपणे व सर्वस्व अर्पण करणारी, तळागाळात जाऊन काम करणारी माणसे, प्रसिद्धीच्या झोता मागे न धावता प्रामाणिकपणे, सर्वार्थाने समाजाची सेवा करीत असतात.

त्यामुळे त्यांच्या पाठीवर कौतुकाची, शाबासकीची थाप देणे, त्यांचे उत्साह द्विगुणित करणे,त्यांना प्रोत्साहन देऊन अशा खऱ्याखुऱ्या समाजरत्नांचा पुरस्कार देत गौरव करणे हे आमचं मूळ उद्देश आहे, असे सांगून त्यांनी शेवटी ५५ पुरस्कर्त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छाही दिल्या.

## प्रसाद खोपकर यांची लायन्स क्लब ऑफ ठाणे नॉर्थच्या अध्यक्षपदी निवड

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

सेवाभावी आणि सामाजिक उपक्रमांसाठी ओळखल्या जाणाऱ्या लायन्स क्लब ऑफ ठाणे नॉर्थच्या अध्यक्षपदी प्रसाद खोपकर यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. नुकत्याच पार पडलेल्या क्लबच्या ३६ व्या क्राऊनिंग समारंभात तिसरे आंतरराष्ट्रीय उपाध्यक्ष केनियाच्या लायन डॉ. मनोज शहा यांच्या हस्ते प्रसाद खोपकर यांनी अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली. यावेळी आंतरराष्ट्रीय ऑफिसरच्या हस्ते सूत्रे स्वीकारण्याचा दुर्मिळ योग आला.

क्लबच्या नव्या कार्यकारिणीतील रशिदा नगारीआ यांनी सचिव, अक्षय लांडगे यांनी खजिनदार, सागर कुलकर्णी यांनी पहिले उपाध्यक्ष आणि तुषार लोहारकर यांनी दुसरे उपाध्यक्ष तसेच इतर पदाधिकाऱ्यांनी सूत्रे स्वीकारली.

अध्यक्षपद स्विकारल्यानंतर प्रसाद खोपकर यांनी क्लबच्या भावी योजना जाहीर केल्या. त्यांनी सांगितले की, "लायन्स क्लब ऑफ ठाणे नॉर्थ सारख्या प्रतिष्ठित क्लबचे नेतृत्व करणे ही सन्मानाची व जबाबदारीची गोष्ट आहे. ठाणे




शहरात सध्या क्लबची सात वैद्यकीय सेवा केंद्रे कार्यरत आहेत. येत्या काळात या केंद्रांमध्ये अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. तसेच अत्याधुनिक वैद्यकीय सुविधांनी सज्ज 'डे मेडिकल हॉस्पिटल' सर्वसामान्य नागरिकांसाठी ह्या वर्षी खुले करण्याचा मानस आहे व त्याचे बांधकाम अतिशय वेगाने सुरू आहे."त्यांनी पुढे सांगितले की, "ग्रामीण भागातील महिलांचे सक्षमीकरण, स्वावलंबी बनवण्यासाठी रोजगार संधी उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाईल. तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी सुविधा , आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक व आरोग्य सुविधा,पर्यावरण यासाठी काम करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

ठाण्यातील मुलांसाठी वक्तृत्व स्पर्धा आयोजित करणे, गरजुनां अन्नदान, ज्येष्ठ नागरिकांना मोफत डायपर पुरवणे, चेक डॅम ची उभारणी या व अशा असंख्य समाज उपयोगी कार्याची पूर्तता करण्यात येईल.

रासायनिक शाखेचे पदवीधर असलेलं प्रसाद खोपकर यांनी ठाण्यातील मो.हा.विद्यालयातून आपले शालेय शिक्षण पूर्ण केले. एका खाजगी आस्थापनेत ते महाव्यवस्थापक म्हणून ते कार्यरत आहेत. लायन्स क्लबमधील वाटचालीत त्यांच्या पत्नी तृप्ती, मुलगी तनया आणि मुलगा तनिष या कार्यक्रमाला लायन्स क्लबचे डिस्ट्रिक गव्हर्नर लायन मनीष लांडगे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

## मुरबाड तालुक्यातील ११ जिल्हा परिषद शाळा शिक्षकांविना

### सामाजिक कार्यकर्ते दिनेश जाधव यांचा आंदोलनाचा इशारा!

◆ **मुरबाड (वार्ताहर) :**

मुरबाड तालुक्यातील ११ जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी कायमस्वरूपी एकही शिक्षक नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोकादायक आहे. सामाजिक कार्यकर्ते दिनेश जाधव यांनी जिल्हा शिक्षणाधिकारी यांचेकडे यासंबंधीचे निवेदन देऊन नाराजी व्यक्त केली आहे.

मुरबाडमधील जिल्हा परिषदेच्या एकूण ३२९ जिल्हा परिषद शाळा आहेत. यापैकी ९ केंद्रातील ११ शाळांना एकही शिक्षक नाही. अंदाजे ३५० विद्यार्थी एकही शिक्षक नसलेल्या शाळेत शिक्षण घेतात. गट शिक्षण अधिकारी मुरबाड यांच्याशी संपर्क साधला असता जवळच्या शाळेतील तात्पुरती शिक्षक दिले असल्याचे सांगितले. शासनाच्या धोरणानुसार बहुतांश



शून्य शिक्षकी झालेल्या शाळांची यादी

| अ.क्र. | शून्य शिक्षकी शाळेचे नाव | केंद्राचे नाव | शेरा |
|---|---|---|---|
| १ | जि.प. शाळा मो-याचापाडा | जांभूडे | |
| २ | जि.प. शाळा ठाकूरवाडी | तळेखल | |
| ३ | जि.प. शाळा गेटवाडी | म्हसा | |
| ४ | जि.प. शाळा मुरबेवाडी | तळेगाव | |
| ५ | जि.प. शाळा बांदलपाडा | नागाव | |
| ६ | जि.प. शाळा मांदोशी | वेळूक | |
| ७ | जि.प. शाळा पारधवाडी | टोकावडे | |
| ८ | जि.प. शाळा आळवे | वेळूक | |
| ९ | जि.प. शाळा भोरांडे | खुटल बा. | |
| १० | जि.प. शाळा खेड | वेळूक | |
| ११ | जि.प. शाळा इंदिरानगर | धसई | |

शाळांना मोजके शिक्षक असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याने अनेक पालकांनी आपल्या पाल्यास खासगी शाळेत दाखल केल्याचे समजते.

या शैक्षणिक धोरणाच्या आडमुठ्या भूमिकेमुळे जिल्हा परिषदेच्या शाळेतील पटसंख्या कमी झाल्याचे दिसून येते. याबाबत अनेक पालकांनी रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे ठाणे जिल्हा ग्रामीण अध्यक्ष दिनेश जाधव यांच्याशी संपर्क साधून खंत व्यक्त केली असता त्यांनी येत्या आठ दिवसांत ११ शाळांना कायमस्वरूपी शिक्षक न दिल्यास पक्षाच्या वतीने ११ जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना घेऊन पंचायत समिती मुरबाड येथे शाळा भरविण्यात येईल असा गर्भित इशारा शालेय प्रशासनाला दिला आहे.

## ६१ महापालिका शाळांत पायाभूत चाचणीस प्रारंभ

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांचे निर्देशानुसार शिक्षण विभागाने शिक्षण विभागाच्या अधिकारी व शिक्षकांच्या मदतीने महापालिकेच्या शाळांचा पूर्णतः कायापालट करण्यासाठी कंबर कसली आहे. यावर्षी शाळा प्रवेशा दिवशीच विद्यार्थ्यांना वह्या-पुस्तके पुरविण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे गणवेश, बुट, दप्तरे इ. आवश्यक सुविधा देखील वर्षाचे सुरवातीला पुरविण्याचे नियोजन आहे आणि आता, महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांचा बौधिक स्तर वाढविण्यासाठी त्यांची शैक्षणिक प्रगती पाहण्यासाठी महापालिकेच्या सर्व शाळांतून विद्यार्थ्यांच्या पायाभूत चाचणीस नुकतेच प्रारंभ झाला आहे.

महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांचे आदेशान्वये प्रत्येक शाळानिहाय पालक अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली असून, या



पालक अधिकाऱ्यांनी स्वतः शाळेत जावून, शाळेत घेण्यात आलेल्या पायाभूत चाचणीची पाहणी केली. महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी पालकत्व स्वीकारलेल्या सिंडेकेट येथील शाळा क्र. ९५/८ या ऊर्दु शाळेतील, तसेच बारावे येथील शाळा क्र. ६८ आणि बारदान गल्ली येथील ऊर्दु व मराठी शाळेस समक्ष भेट देवून शाळेत चाललेल्या पायाभूत चाचणी परिक्षेची पाहणी केली. तसेच स्वतः खडू हातात घेवून विद्यार्थ्यांना शिकवण दिली.

महापालिका शाळांतील विद्यार्थ्यांचा बौधिक स्तर वाढविण्याच्या दृष्टिकोनातून ही पायाभूत चाचणी घेतली जात असून, यानंतर सर्व शिक्षकांसाठी शिक्षण परिषदेचे आयोजन केले जाणार आहे आणि या शिक्षण परिषदेमध्ये विद्यार्थ्यांचा बौधिक स्तर वाढविण्याच्या दृष्टिकोनातून करावयाच्या विविध प्रकारच्या उपायांच्या अंमलबजावणीबाबत ऊहापोह केला जाणार आहे.

महापालिकेच्या या अभिनव संकल्पनेचे शिक्षकांनी देखील कौतुक केले आहे.

### कर्मचाऱ्यांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन

## १५ ते २० वर्षांपासून सेवा करणारे, तरीही कंत्राटी !

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

शासनाच्या उदासीनतेविरोधात अखेर राष्ट्रीय आरोग्य अभियान (एनएचएम) अंतर्गत काम करणाऱ्या हजारो कंत्राटी कर्मचाऱ्यांनी आज ठाण्यात जोरदार राष्ट्रीय आरोग्य अभियान एकीकरण समितीच्या माध्यमातून आंदोलन छेडले. गेली पंधरा ते वीस वर्षे आरोग्य व्यवस्थेचा कणा बनून कार्य करणारे हे कर्मचारी आजही कंत्राटी स्वरूपातच काम करत असून, शासनाच्या दुर्लक्षामुळे त्यांच्या न्याय्य मागण्या धूळखात पडल्या आहेत. ठाणे जिल्हाधिकारी




कार्यालयासमोर सोमवारी एकवटलेले हे अधिकारी व कर्मचारी आपल्या पाच प्रमुख मागण्यांसाठी शांततापूर्ण पण ठाम आंदोलन करत आहेत. शासनाने आता तरी जागे व्हावे आणि वर्षानुवर्षे सेवा देणाऱ्या या कर्मचाऱ्यांना हक्काचे स्थान व सन्मान द्यावा अशी मागणी राष्ट्रीय आरोग्य अभियान एकीकरण समितीने केली आहे. यावेळी आंदोलन करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्या मा. उच्च न्यायालय औरंगाबाद यांच्या निकालाची अंमलबजावणी करावी, १४ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार कर्मचाऱ्यांचे तत्काळ समायोजन करण्यात यावे, एनएचएम कर्मचाऱ्यांच्या मानधनात १०% वाढ करावी, तसेच नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे ५% वार्षिक वाढ लागू करावी, समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांसाठी एकवेळ बदली धोरण लागू करावे, सर्व कर्मचाऱ्यांना विमा संरक्षण व भविष्य निर्वाह निधी योजना लागू कराव्यात, असे समितीचे राज्य समन्वयक मनीष खैरनार यांनी सांगितले. आजच्या आंदोलनाने जिल्हा प्रशासनाचे लक्ष वेधले असले तरी, नेमकी कार्यवाही होईपर्यंत कर्मचाऱ्यांनी आपली लढाई थांबवणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. शासनाने तातडीने दखल घेऊन निर्णय न घेतल्यास राज्यभर तीव्र आंदोलन उभारण्याचा इशारा देण्यात आला आहे. यावेळी समितीचे मनीष खैरनार, जयवंत विशे, प्रदीप पाटील आदींच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. कोरोना महामारीसारख्या काळात जीवाची पर्वा न करता सेवा देणाऱ्या या कर्मचाऱ्यांचे योगदान कोणाला माहीत नसावे, असे नाही. तरीही त्यांना आजवर ना कायम नियुक्ती मिळाली, ना योग्य वेतन, ना सामाजिक सुरक्षा. त्यामुळं कर्मचारी वर्गामध्ये प्रचंड नाराजी आहे. गेल्या १७ वर्षांपासून शहरी ग्रामीण भागात सेवा देतो. पण शासनाने आम्हाला कधी एवढं करूनही न्याय न मिळाल्यास आम्ही कुणाकडे जावं? असे कर्मचाऱ्यांनी म्हटले आहे.

## कचरा वाहतूक कर्मचाऱ्यांसाठीचे आरोग्य शिबीर उत्साहात

◆ **नवी मुंबई (वार्ताहर) :**

महापालिका प्रशासनातील घनकचरा विभागात कार्यरत कचरा वाहतूक कर्मचाऱ्यांसाठी कोपरखैराणे येथे सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत आयोजित करण्यात आलेले आरोग्य शिबीर उत्साहात पार पडले.

महाराष्ट्र कर्मचारी युनियन संलग्न इंटक, आयटीएफ यांच्या माध्यमातून सानपाडा पामबीच विभागातील सूरज हॉस्पिटल, दाताचे डॉक्टर स्वप्नील भागवत, डोळ्यांचे सेंटर फॉर साईट हॉस्पिटल नेरूळ यांच्या सहकार्याने एजी इन वायरो इन्फ्रा प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे कर्मचारी तसेच कोपरखैरणे येथील घनकचरा



विभागातील कर्मचारी यांच्यासाठी हे शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात सहभागी कर्मचाऱ्यांसाठी मोफत इसीजी, ब्लड शुगर, मानसिक विकार, मणक्याचे आजार, मेंदूचे आजार, एक्स रे, नेत्र तपासणी, दंत तपासणी आदी विविध तपासणी करण्यात आल्या. हे कर्मचारी दररोज कचरा संकलन करणे, वाहतूक करणे आदी कामे नियमित करत असले तरी ते स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र कर्मचारी यूनियनच्या माध्यमातून या आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरात सहभागी झालेल्यांची तपासणी करुन संबंधितांना मोफत गोळ्या, औषधे देण्यात आली. या शिबिरात घनकचरा विभागातील कचरा वाहतूक कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शिबीर आयोजित केल्याबाबत कर्मचाऱ्यांनी महाराष्ट्र कर्मचारी युनियनचे व कामगार नेते रवींद्र सावंत यांचे आभार मानले.



# इव्हेंट मॅनेजमेंट कसे करावे

मनस्विनी
पूर्णिमा शिंदे



माणूस हा सामाजिक प्राणी. समाजामध्ये निरनिराळ्या कार्यक्रमांमधून, समारंभातून तो त्याचे अस्तित्व टिकवून असतो. हे टिकविण्यासाठी कार्यक्रमाची तयारी कशी करावी? आज आपण पाहूया तर एखादा कार्यक्रम, समारंभ, सोहळा पार पाडण्यासाठी सगळ्यात महत्त्वाचं असतं नियोजन! मग ते वेळ, पैसे, शक्ती यांचेही. आता हे सगळं आहे आपल्याकडे याच्या जोडीला युक्तीच नसेल सगळं पाण्यात! वेळ सर्वांना अनुकूल असावी. कार्यक्रमाची वेळ ठरवताना वार, दिनांक, सुट्टी, मुहूर्त पाहण्यात यावा. बरं अंतर दूर असेल तर पोहोचणारी मंडळी वेळेवर पोहोचतील का? याची खातरजमा करून घ्यावी. साधारण कार्यक्रमाच्या दिवशी वेळेआधी नियोजनामध्ये असलेल्या सर्व समिती अधिकारी, कर्मचारी यांनी कार्यक्रम स्थळी पोहोचावे. प्रेक्षक येणारी मंडळी सर्वांना आमंत्रण पोहोचली आहेत का? योग्यवेळी योग्य ठिकाणी ते कार्यक्रमाचे स्वरूप कसे? ती रूपरेखा काय? कशी? कार्यक्रम जास्तीत जास्त देखणा होण्यासाठी किंवा पार पाडण्यासाठी आपण कोणकोणते प्रयत्न करायचे? हे सुद्धा समजले पाहिजे. उदा. कार्यक्रमाचे स्वरूप मुंज, पाचवी, बारसं, साखरपुडा, लग्न, हळद, संगीत, मेहंदी, शुभमंगल, जन्मदिन, साठी, पंच्च्याहत्तरी इ., सुवर्णमहोत्सव, वर्धापन दिन, पूजा, स्पर्धा मेळावे, परिसंवाद, जयंत्या, बक्षिसे वितरण, पुस्तक प्रकाशन, शालेय गुणगौरव, महापुरुषांची जयंती, पुस्तके वाटप, बक्षीस वितरण, खेळ पैठणीचा, मनोरंजन, मैफल, नृत्य, नाट्य, काव्य, ग्रंथमहोत्सव, एकांकिका, मुलाखती, पथनाट्य, कला स्पर्धा, भजनी मंडळ स्पर्धा, साहित्यिक स्पर्धा, साहित्यिक मेळावे, सांस्कृतिक, शैक्षणिक, सामाजिक उपक्रमांचे कार्यक्रम, चर्चासत्रे, व्याख्यानमाला, बैठका, लावण्या, सांस्कृतिक, संदर्भ, विधायक कामांचे उद्घाटन, रस्ता उद्घाटन, मंदिराचा जीर्णोद्धार, गृहनिर्माण संस्थांचा, बचत गटांच्या उत्पादनाचे प्रदर्शन इ. मोठ-मोठे कार्यक्रम असे विविध प्रकार आणि स्वरूप असतात. या वैविध्यपूर्ण कार्यक्रमाला त्या-त्या कार्यक्रमानुसार संदर्भानुसार आखणी-देखील करावी लागते. मूळ कार्यक्रमाचे उद्दिष्ट ठरविणे. हेतू, दृष्टिकोन पाहता वयोगट, प्रेक्षक व जागा निश्चित करणे. ती नोंद श्रोतृवर्ग पाहता जसा वक्ता विषय ठरवावेत. तसेच प्रेक्षक मंडळी त्यांची मागणी, कल, अभिरुची, दर्जा विचारात घ्यावा. कार्यक्रमाची निवड, रूपरेषेवर भर द्यावा. तसा निवेदक नेमावा. नियोजन, आखणी, खर्च, कार्य विभागणी समिती जबाबदारी कामे वाटून द्यावी. विश्वासार्हता असावी. पारदर्शकता असावी. सर्वसमावेशकता असावी. कार्यक्रमाची रंगत वाढवण्यासाठी सर्वांनी



एकत्र येऊन, उदात्त हेतूने एकजुटीने कार्य तडीस न्यावे.

यशस्वी करावे आणि सर्वांना विचारात घेऊन सर्वांनी एकमेकांशी प्रेमाने वागावे. मी म्हणेल ती पूर्व दिशा असे नाही. तर चार अशी चार तशी माणसं असतात, पण त्यांना बरोबर घेऊन आपल्यासोबत टिकवावे. स्वतःला शहाणं समजतात, दुसऱ्याला मूर्ख समजतात. तो मीपणा, बडेजावपणा, आपलं घोडं पुढे दांबटणे, अति गर्व, अति राग, दुसऱ्यांना हीन, तुच्छ लेखणे. कमी लेखणे. स्वतः पुढे पुढे करणे. या विकृत प्रवृत्तींना थारा नसावा. संत मंडळी पंढरीची दिंडी पायी करतात. या पायवारीमध्ये जातात तेव्हा सगळी नाचून गाऊन दंग होतात. मग त्यांच्यात कुठे असते? ही मीपणाची बाब हा विकृतपणा. आपला कार्यक्रम देखणा, सुंदर सोहळा पार पाडावा. यासाठी कार्यक्रमाची तयारी ही एक-दोन महिने आधीच, अगोदर सुरू करावी. सर्वांना सोयीचे सभागृह आरक्षित करणे. खुर्च्या ठरविणे. व्यासपीठ, सजावट, माईक, बॅनर, चहापाणी, नाश्ता, निमंत्रण पत्रिका हे वेळेवर होण्यासाठी सर्वांनी लगबगीने काम करावे. कामात झोकून घ्यावे. एकाच माणसावर कामाचा लोड येऊ नये. पुष्पगुच्छ ऐवजी पुस्तके, झाडे, रोपटे, तुळशी दिल्यास पर्यावरण पोषक मूल्य रुजवली जातील. डीजे, ढोल, ताशा, लाऊडस्पीकर यापेक्षा सुरेल सनई सूर अथवा पसायदान, पखवाज मंदसूर गुंजावे. ध्वनिप्रदूषण होऊ नये. याची काळजी घ्यावी. सर्वांचा वेळ वाचेल, सर्व उपस्थित मान्यवर पाहुण्यांचे, वक्त्यांचे मनोगत, विचार ऐकता यावेत. शांतता बाळगावी, प्रत्येकास बोलण्यास समान वेळ दिल्यास बाकी पाहुण्यांवर अन्याय होणार नाही. याची दक्षता घ्यावी. कारण लांबून आलेले पाहुणे त्यांचे मोलाचे विचार ऐकावेत. त्यांची राहण्याची आणि जेवणाची उत्तम व्यवस्था असावी, त्यांच्या वयाचा आदर करावा, स्वागत करावे. सामाजिक भान कार्यक्रमाच्या जागी ठेवावे.

कधी कधी कार्यक्रम काही कारणाने रद्द झाला, तर त्यावेळी आपली मानसिकता वास्तव स्वीकारणारी असावी. अचानक निर्माण झालेली ओढावलेली आपत्ती, बदल, आयत्या वेळेची दुर्घटना याला तोंड देता यावे. त्याकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन समतोल साधणारा, सकारात्मक आणि संतुलन ठेवणारा असावा. पूर, त्सुनामी, अपघात, अशा निसर्ग आपत्कालीन समस्या ओढावतात. त्यामध्ये आयोजक नियोजकांनी खचून न जाता पुन्हा नव्या जोमाने सामोरे जावे. प्रत्येक गोष्टीतून नवनवे शिकावे. कार्यक्रमाच्या संदर्भ नवे निर्णय घ्यावेत, कार्यक्रमात उद्दिष्ट पूर्तीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत. कार्ये, सोहळा तडीस न्यावा. असे इव्हेंट करताना प्रसंगानुरूप निवेदक, प्रेक्षक, आयोजक यांच्या सुसंवाद हवा. सर्वांनी मिळून समारंभ उंचीवर नेण्यास प्रयत्न करावे आणि तो यशस्वी करावा. कार्यक्रमात सुसूत्रता असावी. देशनिष्ठा, सामाजिक भान, नैतिक मूल्य आणि मानवता या आनुषंगाने विशेष काळजी घ्यावी. असे असावे कार्यक्रमाचे इव्हेंट मॅनेजमेंट!

आज-काल सर्वच कार्यक्रमाचे इव्हेंट साकारताना प्रथम सर्वप्रथम आपली परिस्थिती अनुरूप आपण साकारावेत. समाजामध्ये सर्वांना बरोबर घेऊन चालावे. उच्चनीच भेदभाव नसावा. सर्वात महत्त्वाचे समता, एकता, बंधुता आणि मानवता या उद्दिष्ट पूर्तीसाठीच हे समारंभ असावेत. त्यातून काहीतरी आनंद लाभावा. हे उद्दिष्ट आणि संवेदनशीलता हे मूल्य जोपासावे.



# 'ये रीत अमर कर दो'

नॉस्टॅल्जिया
श्रीनिवास बेलसरे



'प्रेमगीत' हा सुदेश इशार यांनी दिग्दर्शित केलेला १९८१ सालचा सिनेमा. त्याची कथा होती शशी भूषण यांची आणि प्रमुख कलाकार होते राज बब्बर (आकाश भारद्वाज ऊर्फ कवी निशांत) आणि अनिता राज खुराना (शिखा). अनिता राजचा हा पहिला सिनेमा. तिने नंतर 'मेहेंदी रंग लायेगी'(१९८२), 'दुल्हा बिकता हैं'(१९८२), 'जरासी जिंदगी', 'प्रेम तपस्या', 'नौकर बीवीका', 'अच्छा बुरा', 'जीत हमारी', 'थाई विदु' ('जीत हमारी'चा तामिळ रिमेक), असे ८० च्या आसपास सिनेमा केले.

तिने १९८६ पासून टीव्हीवरही अनेक भूमिका केल्या. सध्याही ती 'ये रिश्ता क्या कहलाता हैं'मध्ये काम करते आहे. 'प्रेमगीत' मध्ये राजबब्बर आणि अनिताबरोबर मदन पुरी, रजनी शर्मा, सोकर जानकी, शशी रंजन, विजू खोटे, शम्मी (कपूर नाही.), कोमल सोनी, गुलशन ग्रोवर असे अनेक कलाकार होते.

या सिनेमाचे एक वैशिष्ट्य म्हणजे अनेकदा खलनायकाच्या भूमिका केलेला राज बब्बर प्रेमगीतमध्ये रोमँटिक नायक होता. तसेच फक्त खलनायकी भूमिकाच केलेले मदनपुरी प्रेमगीतमध्ये एका प्रेमळ पित्याच्या भूमिकेत होते.

आकाश मित्रात लोकप्रिय आहे. ते सगळे ट्रीपला म्हणून शिमल्याला जातात. तिथे हॉटेलमध्ये त्यांची भेट नृत्यांगना शिखाशी होते आणि तो तिच्या प्रेमात पडतो. आकाश हाच आपला आवडता कवी निशांत आहे हे माहीत नसल्याने तो जेव्हा ओळख करून घ्यायचा प्रयत्न करतो तेव्हा शिखा त्याचा अपमान करते; परंतु पुढे ओळख पटल्यावर त्यांचे प्रेम फुलते. आकाशचे वडील (मदन पुरी) या लग्नाच्या विरुद्ध असतात. आकाश जेव्हा त्यांना सांगतो की, शिखाला ब्रेन ट्युमर आहे आणि तिच्या हातात केवळ ६ महिनेच आहेत. तेव्हा सगळे चित्र पालटते. पूर्ण कुटुंबच तिची अतिशय प्रेमाने काळजी घेऊ लागते. आकाश तिच्याशी लग्नालाही अनुमती मिळवतो.

शिखाला आपल्या असाध्य रोगाबद्दल माहिती नसते. नंतर सगळेच सर्वांना माहीत होते. दुसऱ्याला दुःख होऊन नये म्हणून सगळेच हे नकोसे सत्य एकमेकांपासून लपवतात. शिखाही तेच करते.

एक असह्य दुःख मूकपणे सहन करताना प्रिय व्यक्तीवर तिच्या आयुष्यातील शेवटच्या क्षणापर्यंत प्रेमाचा वर्षाव करण्याची सर्वांची धडपड पाहून प्रेक्षकांचे डोळे पाणावतात. अस्सल अभिनयाचे अनेक क्षण आणि शशीभूषण यांचे संवाद केवळ अप्रतिम आहेत.

दुर्दैवाने प्रेमगीत ही एक शोकांतिका होती आणि सिनेमात मोठी नावे नसल्याने उत्तम कथा, उत्तम अभिनय, उत्तम संगीत असूनही सिनेमाला हवी तेवढी प्रसिद्धी मिळाली नाही. काहींच्या मते प्रेमगीतच्या पूर्वी राज बब्बरने 'इन्साफ का तराजू'मध्ये केलेल्या नकारात्मक भूमिकेमुळे असे झाले असावे. मात्र १९८० च्या दशकातील रोमँटिक सिनेमांच्या मालिकेत प्रेमगीतचे स्थान एक क्लासिक चित्रपट असेच आहे.

हसरत जयपुरींचे एक गाणे आजही लोकप्रिय आहे. जगजीतजींचे कर्णमधुर संगीत गाण्यानंतरही कानात घुमत राहते. गाण्याचे शब्द होते -

*'होंठोंसे छू लो तुम,*
*मेरा गीत अमर कर दो.*
*बन जाओ मीत मेरे,*
*मेरी प्रीत अमर कर दो.'*

निशांत कवी आहे तर शिखा नृत्यांगना. ती त्याच्या कवितांची चाहती आहे. मात्र तिला आकाशच 'निशांत' आहे हे माहीत नाही. तो मात्र तिला कळकळीने विनवतो आहे, 'प्रिये, तू माझी कविता गाशील? तुझ्या ओठांच्या अमृतस्पर्शाने ती अमर होईल. तू माझ्या प्रेमाचा स्वीकार केलास तर तेही अमर होईल.'



आजपासून ४४ वर्षांपूर्वी कर्करोग असाध्य मानला जाई. त्याचे निदान म्हणजे मृत्यूचे बोलावणे असेच मानले जाई आणि तेव्हा ती वस्तुस्थिती होती. त्यामुळे पुढच्या ओळी येतात -

*'ना उम्रकी सीमा हो,*
*ना जन्मका हो बंधन.*
*जब प्यार करे कोई,*
*तो देखे केवल मन.*
*नयी रीत चलाकर तुम,*
*ये रीत अमर कर दो.'*

प्रिये, आयुष्याची मर्यादा प्रेमाला नसते. आयुष्य संपल्यावरही शिल्लक राहिले तरच ते खरे प्रेम. शरीर तर नष्ट होणारच आहे. त्यामुळे आयुष्य, शरीर, त्याचे सौंदर्य हे बघून प्रेम करण्यात काय अर्थ? महत्त्वाचे आहे ते मन आणि त्यातले अदृश्य प्रेम! तुही माझ्याप्रमाणे हे स्वीकार. आपण शरीरापेक्षा मनाला महत्व देण्याचा रिवाज प्रेमाच्या साम्राज्यात आपण रूढ करू. मला तुझी साथ दे.

प्रियतमेचे प्रेम न मिळाल्याने त्याला जीवन व्यर्थ वाटते आहे. तो म्हणतो, आकाश जसे पोकळ, मोकळे, रिते असते तसे माझे मन तुझ्या अनुपस्थितीने एकाकी आहे. तू पायातले पैंजण वाजवत माझ्या आयुष्यात ये ना. तुझ्या येण्याने माझी कविता, माझे संगीत चिरंजीवी होईल.

*'आकाशका सूनापन,*
*मेरे तनहा मनमें,*
*पायल छनकाती तुम,*
*आ जाओ जीवनमें.*
*सांसें देकर अपनी,*
*संगीत अमर कर दो.'*

शिखाला आपल्या जीवनातील तिचे महत्त्व पटावे म्हणून आकाश अनेक प्रकारे तिला विनवतो. तो म्हणतो मला कुणीही आवडले की नियती माझ्याशी क्रूर खेळ खेळते आणि ती व्यक्ती माझ्या जीवनातून निघून जाते. मी आजवर सगळीकडे हरत आलो आहे. पण निदान यावेळी तरी तू हे टाळू शकतेस. तुझे हृदय हरून तूच मला जिंकल्याचे सुख देऊ शकशील. कृपाकरून माझे प्रेम स्वीकारून त्याला अमरत्व दे ना.

*'जगने छीना मुझसे,*
*मुझे जो भी लगा प्यारा.*
*सब जीता किये मुझसे,*
*मैं हरदमही हारा.*
*तुम हारके दिल अपना,*
*मेरी जीत अमर कर दो.'*

'अखियोंके झरोकोंसे' 'मिली, 'आनंद', 'सफर' 'प्रेमगीत' 'एक दुजेके लिये' या सगळ्या शोकांतिका आहेत. आजच्या जगात कुणालाच दुःख अनुभवणे तर काय पाहणेही नको आहे. आयुष्य केवळ चंगळ, धमाल करत भोगायचे असते हा समज मनामनात बिंबवण्यात मनोरंजन विश्वाला प्रचंड यश आले आहे. त्यामुळे लोक फक्त धमाल, धूम, विनोद पाहण्यातच मनोरंजन आहे असे मानतात. मराठीत तर विनोदी चित्रपटांना, हास्य-मालिकांना सर्वात जास्त पसंती मिळते; परंतु मास कम्युनिकेशनच्या ज्या अनेक थियरी आहेत त्यात एक 'थियरी ऑफ कॅथार्सिस' म्हणून ओळखली जाते. तिच्यानुसार जर सिनेमा नाटक, कादंबरी यात दुःख, संघर्ष, शोकांतिका पाहिल्या तर मनातील भावभावनांचे विनासायास विरेचन होते. त्या त्या पात्रांची दुःखे, आनंद, चिंता, अनुभवताना आपल्याही भावना मोकळ्या होऊन मन स्वच्छ होते, त्याची कुंठीत अवस्था संपून ते प्रवाही होते. म्हणून अशा कलाकृतीचाही आस्वाद अवश्य घेतला पाहिजे. मनाच्या निकोप, समतोल वाढीसाठी सुखांतिकाबरोबर शोकांतिकांचेही वेगळे महत्त्व आहे. यावर हरी नारायण आपटे १८९० सालीच म्हणून गेले आहेत, 'पण लक्षात कोण घेतो?'

# देव आणि माणूस...

संवाद
गुरुनाथ तेंडुलकर



वास्तविक हा प्रकार गेली वर्षानुवर्ष चाललाय म्हणे... मला मात्र हा प्रकार अगदी अलीकडेच समजला. वाराणसीच्या जगन्नाथ मंदिरात जगन्नाथावर दररोज महाभिषेक करतात. सततच्या अभिषेकामुळे देवाला सर्दी पडशाचा त्रास होतो अशी भाविकांची श्रद्धा आहे.

देवाला सर्दी पडसं झालं की देवही हैराण होणारच की, त्यालाही आराम हवाच. म्हणून देवाला आठ-दहा दिवस आराम दिला जातो. देवदर्शन बंद ठेवलं जातं. एवढंच नव्हे तर या दहा दिवसांच्या काळात देवावर औषधोपचारही केले जातात. लवंग, वेलची, जायफळ, तुळस, खडीसाखर, मध, चंदन, गुलाबपाणी आणि इतरही काही औषधी वनस्पती वापरून पुजारी मंडळी देवावर उपचार करतात. देवाला लेप वगैरे लावतात आणि देवाच्या अंगावरचा हा लेप नंतर भक्तांना प्रसाद म्हणून वाटण्यात येतो. भक्तही अगदी चवीने हा प्रसाद चाखतात आणि ताजेतवाने होतात. पुजाऱ्यांनी केलेल्या औषधोपचारामुळे आजारी पडलेला देव आठ-दहा दिवसांत खडखडीत बरा होतो आणि पुन्हा वर्षभर भक्तांना दर्शन द्यायला, त्यांची सगळी कामं करायला सज्ज होतो.

मी हे जे काही सांगितलंय यात एक पैशाचीही अतिशयोक्ती नाहीये. तुम्ही स्वतः वाराणसीच्या जगन्नाथ मंदिरात जाऊन खात्री करून घेऊ शकता. माणसांची श्रद्धा कोणत्या थराला जाऊन कोणतं रूप घेऊ शकते याचं हे एक उदाहरण. अशा प्रकारची अनेक उदाहरणं आपल्याला आढळतात.

वेगवेगळ्या ठिकाणी देवाला देवाला कोंबडी, बकरा मारून मटणाचा नैवेद्य दाखविला जातो तर काही ठिकाणी काही दैवतांना दारू देखील दिली जाते. शंकर महाराज नावाच्या एका संताच्या मठात तर म्हणे भाविक मंडळी नैवेद्य म्हणून चक्क सिगारेटी ठेवतात. तर आणखी कुठल्या तरी महाराजाला म्हणे तंबाखूची चिलीम अर्पण करतात. देवदासी या प्रकारात देवाची सेवा करण्याच्या नावाखाली मुलींना वाऱ्यावर सोडलं जातं. त्यांचं सारं आयुष्य देवाच्या नावाखाली उद्ध्वस्त केलं जातं. अर्थात हे झाले टोकाचे प्रकार. पण आपण सर्वसामान्य माणसं देखील संकष्टीला घरी मोदक करून गणपतीला नैवेद्य दाखवतोच की संकष्टी चतुर्थी, अंगारकीच्या निमित्ताने उपवास केला जातो. रोजच्या जेवणात थोडा बदल होतो. थोडं गोडधोड केलं जातं. पूजेच्या निमित्ताने घरात धुपाचा गंध दरवळतो, वातावरण सुगंधीत होतं. आपलं मन ताजंतवानं होतं.

कधीतरी वर्षातून आपल्या घरी एखाद्या इष्ट देवतेची पूजा किंवा विष्णुसहस्त्रनाम पठणाचा कार्यक्रम केला जातो. त्यानिमित्तानं चार माणसं एकत्र येतात. हे इथपर्यंत ठीक आहे. देवाचं अस्तित्व मानण्याला कुणाचीच हरकत नसावी. कारण देव ही संकल्पना फार प्राचीन आहे. हजारो, लाखो वर्षांपासून ही परंपरा चालत आलीये.

अगदी आदिमानवाच्या काळापासून ते आजच्या कॉम्प्युटर युगापर्यंत 'देव' नावाच्या शक्तीचं अस्तित्व सगळ्यांनीच मान्य केलंय. त्याबद्दल कुणीच आक्षेप घेण्याचं कारण नाही. पण... देव या संकल्पनेत ज्यावेळी माणसाचा स्वार्थ शिरतो त्यावेळी मात्र सगळंच नासून जातं. पातेलंभर दुधामध्ये चिमुटभर मीठ पडावं तसं होतं. मांगल्याचं रूपांतर अमंगलात होतं.

'देव आहे', 'तो शक्ती देतो', 'त्यानं दिलेली शक्ती संकटात भक्तांना तारते.' इथपर्यंत श्रद्धा असणं ठीक आहे. पण तो देव प्रसन्न व्हावा म्हणून त्याला नवस केले जातात. ते नवस करण्यासाठी 'पुजारी' नावाचा कुणी मध्यस्थ, दलाल लागतो. या मध्यस्थांमार्फत भक्तांनी देवाबरोबर बोलायचं. तो पुजारी म्हणजे देव आणि भक्त यांच्यातील जणू दुभाषाच असतो.

पुढे पुढे तर हा पुजारी देवापेक्षाही मोठा होतो. 'देवाला हे हवं.' आणि 'देवाला ते हवं.' असं सांगून गोरगरीब श्रद्धाळू भक्तांना हे पुजारी नागवतात. अनेकदा हे पुजारी केवळ देवळातच नसतात. भगत, गुरव, मांत्रिक-तांत्रिक अनेक रूपांत हे 'देवाचे दलाल' आपल्यासमोर येतात. भक्तांची श्रद्धा हेच यांचं भांडवल असतं. वेळप्रसंगी भोळ्या भाबड्या भक्तांना धाकही घातला जातो. पूजा अर्चा, होम हवन, मंत्रजागरपासून ते नारायण-नागबळीपर्यंत... क्वचित तर नरबळी सुद्धा...!

अलीकडे पुणे-मुंबई सारख्या मोठ्या शहरात या पुजारी मांत्रिक तांत्रिकांच्या बरोबरीने आणखी एक वर्ग उदयाला आलाय. तो म्हणजे बुवा, बापू, महाराज, स्वामी लोकांचा...

मंदिरातला पुजारी काय किंवा गावातला भगत-मांत्रिक हा केवळ भक्त आणि भगवंत यांच्यातला दुवा असतो. इथं तर हा बुवा-बापू म्हणजे साक्षात भगवंतच असतो. पुजारी भक्तांना देवाची पूजा करायला लावून पैसे उकळतो इथं तर हा बाबा भक्तांकडून स्वतःचीच पूजा करून घेतो. मांत्रिक तांत्रिक काय किंवा पुजारी गुरव काय कधीही स्वतः देवापेक्षा मोठे असल्याचा दावा करीत नाहीत. स्वतःचे फोटो विकत नाहीत.

सिद्धिविनायकाच्या देवळाजवळ फोटो विकले जातात ते गणपतीचे. सिद्धिविनायकाचे. पण इथं तर या 'बुवा-बापू'च्या सत्संगात त्या त्या बुवा-बापूचे फोटो विकले जातात. जिवंत माणसाचे फोटो लोक घरी घेऊन देव्हाऱ्यात लावतात. त्याची पूजा करतात. त्या बुवा-बापूची भक्ती करण्यात हे भक्त तल्लीन होऊन जातात. त्यामुळे आंधळी श्रद्धा कोणत्या थराला जाऊ शकते आणि कोणत्या प्रकारचं रूप घेऊ शकते याला सीमाच नसते. एकदा बुद्धी अंध झाली की विचार करण्याची शक्तीच खुंटते. आपल्या आजूबाजूला पाहिलंत तर आपल्याही ओळखी-पाळखीत, आप्त-मित्र-परिवारात अशा प्रकारची कोणत्या ना कोणत्या तरी बुवा-बापूच्या भजनी लागलेली आणि त्या बुवा-बापूला साक्षात देवाचा अवतार समजणारी माणसं आढळतील.

संत कबिराची एक गोष्ट आठवली म्हणून सांगतो... संत कबीर एकदा एका नदीच्या काठाने चालले असता त्यांनी एके ठिकाणी दहा-बारा माणसं गोळा झालेली पाहिली. ते जवळ गेले.

तिथं एक पुजारी काही तरी मंत्र पुटपुटत होता आणि लोक नदीच्या पात्रात भाताचे गोळे सोडत होते. कबीर जवळ गेले आणि त्यांनी हा काय प्रकार आहे अशी विचारणा केली. त्यावेळी त्यांना उत्तर मिळालं की, शेटजींचा मुलगा शिक्षणासाठी परदेशात गेला होता. तिथं त्याला कोणत्याही अडचणी येऊ नयेत. तिथं त्याला अन्नपाणी व्यवस्थित मिळावं म्हणून इथं ब्राह्मणांना सुवर्णमुद्रा दान करून हे भाताचे गोळे नदीच्या पात्रात सोडले जाताहेत.

कबीर हसले आणि त्यांनी नदीचं पाणी ओंजळीत घेऊन जोरजोरात ओरडत किनाऱ्यावर टाकायला सुरुवात केली. त्या शेटजींनी विचारलं, 'कबिरजी, हे काय चाललंय ?'

'मी माझ्या शेताला पाणी घालतोय...''पण तुमचं शेत आहे तरी कुठे?' शेटजींनी प्रश्न केला. 'शेत दोन मैलांवर आहे.' कबीर उत्तरले.मग इथं किनाऱ्यावर पाणी ओतून दोन मैलांवरच्या शेताला पाणी थोडंच मिळणार आहे?' शेटजींच्या चेहऱ्यावर आश्चर्य आणि नाराजी उमटली. 'कां नाही? जर तुम्ही इथं मंत्र म्हणून नदीच्या पाण्यात टाकलेलं अन्न हजारो कोस दूर असलेल्या तुमच्या मुलापर्यंत पोहोचतं तर मग माझं शेत तर फक्त दोनच मैल लांब आहे.' कबिरानं मिश्कीलपणे उत्तर दिलं.

कोणत्याही जिवंत बाबा-बापूच्या फोटोसमोर जेवणाचं ताट ठेवून नैवेद्य दाखविणाऱ्या भाबड्या भक्तांना जर तुम्ही हे सांगायला गेलात तर त्यांना ते पटेल? मुळीच पटणार नाही. उलट ते भक्त तुम्हालाच चार गोष्टी सुनावतील.

आमचे 'स्वामीजी' म्हणजे सामान्य माणूस नाहीच मुळी. ते साक्षात भगवंताचे अवतार आहेत. ते त्रिकाळज्ञ आहेत. त्यांना आपल्या मनातील सगळं कळतं. वगैरे वगैरे वगैरे... तुम्ही आणखी वाद घालायला गेलात तर तो भक्त तुम्हाला त्याला स्वतःला आलेल्या आणि इतरांना आलेल्या अनुभवाच्या चार गोष्टी सुनावेल.

बुद्धीने अंध झालेल्या अशा माणसांना सूर्योदय दाखविणं हा आपला मूर्खपणा ठरतो. तो करूच नये पण त्याचबरोबर आपण स्वतः वागतांना मात्र असे आंधळेपणाने तर वागत नाही ना याची वेळोवेळी जाणीव ठेवणं मात्र फार आवश्यक असतं. आपण अंधश्रद्धेच्या विळख्यात अडकून असला काही मूर्खपणा करीत नाही ना, याचा शोध प्रत्येकाचा प्रत्येकानं घ्यायला हवा.

जगात देव आहे की नाही या वादात न पडता देव ही निसर्गातली एक महान शक्ती आहे याची जाणीव ठेवून तिच्यासमोर नतमस्तक जरूर व्हावं. त्या शक्तीजवळ बुद्धी मागावी. मन एकाग्र होऊन हाती घेतलेल्या कार्यात यश दे अशी विनंती करावी. कार्य निर्विघ्न पार पडू दे अशी प्रार्थना करावी. पण त्याचबरोबर आपलं काम आपल्यालाच करायला हवं याची मनोमन जाणीव ठेवावी. देवाकडून फक्त प्रेरणा घ्यायची. उर्वरित कार्य स्वतःचं स्वतःच करायचं...

देव ही एक शक्ती आहे, व्यक्ती नाही याची सतत जाणीव ठेवायची आणि म्हणूनच देवाला सर्दी पडसं झालं म्हणून औषधोपचार करून त्याला आपल्यासारख्या सर्वसामान्य माणसांच्या पातळीवर आणू नये... आणि त्याचबरोबर... बाबा बापू - स्वामी - महाराज म्हणून वावरणाऱ्या एखाद्या जिवंत माणसाला 'अनंत कोटी ब्रम्हांडाचा नायक असं म्हणून देवाच्या पातळीवर नेऊ नये...! खरंय ना?

# बलरामाकडून ब्रह्महत्या व प्रायश्चित्त

महाभारतातील मोतीकण
भालचंद्र ठोंबरे



बलराम श्रीकृष्णांचे मोठे बंधू तसेच दुर्योधन व भीम यांचे गुरू होते. दुर्योधन व भिमाला बलरामाने गदायुद्धाचे प्रशिक्षण दिले होते. जेव्हा कौरव पांडवामध्ये युद्ध होणार हे निश्चित झाले तेव्हा दोन्ही सैन्याची जुळवाजवळ करण्यासाठी भेटीगाठी घेणे सुरू होते. तेव्हा तटस्थ राहण्याच्या उद्देशाने बलराम तीर्थयात्रेला निघून गेले.

पृथूदक, बिंदूसर, त्रितकूप, सुदर्शनतीर्थ, विशालतीर्थ, ब्रह्मतीर्थ, चक्रतीर्थ आदी तीर्थक्षेत्रांना भेटी दिल्यानंतर ते नैमिषारण्यात आले. नैमिषारण्यात ऋषीमुनींचे सतत वास्तव्य होते. बलराम आल्याचे पाहून सर्व ऋषीमुनींनी उठून त्यांचा आदर सत्कार व स्वागत केले. मात्र रोमहर्षण आपल्या आसनावरच बसून होता. रोमहर्षण हा क्षत्रिय पित्याच्या व ब्राह्मण मातेच्या पोटी सुतकुळात जन्मलेला पूत्र होता. महर्षी व्यासांचा शिष्य असलेला रोमहर्षण ज्ञानी, पुराण, धर्मशास्त्र आणि इतिहासाचा अभ्यासक होता. एवढे असूनही तो बलराम व त्यांच्यासोबत आलेल्या ब्राह्मणांच्या स्वागतासाठी न उठल्याने त्याचीही कृती गर्विष्ठपणाची असल्याचे बलरामला जाणवले. त्यामुळे त्याचे अध्ययन हे केवळ धार्मिकतेचे ढोंग आहे आणि जे लोक धार्मिकतेचे ढोंग करून धर्माचे पालन करीत नाहीत ते अधिक पापी होत. त्यांना शासन करण्यासाठीच मी या जगात अवतार घेतला आहे असे म्हणून जरी बलराम तीर्थयात्रेसारख्या पवित्र कार्यात असले तरी त्यांनी दर्भाच्या साहाय्याने रोमहर्षणाला ठार केले.

हे पाहून सर्व मुनी हळहळले. तर देवांनी बलरामाला आपणच त्यांना हे ब्रह्मासन दिले असल्याचे सांगितले. त्यांची हत्या करून आपण अजाणतेपणाने का होईना ब्रह्महत्या केली आहे. आपण स्वतःच ज्ञानी आहात. तेव्हा आपण स्वतःच या ब्रह्महत्येचे प्रायश्चित्त घ्यावे असे सांगितले. तेव्हा बलरामाने देवताना प्रथम श्रेणीचे कोणते प्रायश्चित्त घ्यावे, अशी विचारणा केली. तुम्ही या सुताला काय देऊ इच्छिता ते सांगा. ते मी सर्व त्याला देईन असेही आश्वासन दिले, तसेच रोमहर्षणच्या जागी त्यांचा पुत्र तुम्हाला कथा सांगेल व तो दीर्घायुषी व बलशाली होईल, असे सांगून पुन्हा आपल्या प्रायश्चिताबद्दल विचारणा केली.

तेव्हा ऋषी म्हणाले, बल्व नावाचा एक दानव यज्ञाच्या पर्व काळी येऊन कुंडात रक्त, मांस, मलमूत्र टाकून दूषित करतो. आपण त्याला ठार करा व त्यानंतर एक वर्ष भारतवर्षाची प्रदक्षिणा केल्यास आपण ब्रह्महत्तेच्या पापातून मुक्त व शुद्ध व्हाल. बलरामाने ऋषींचे म्हणणे मान्य केले. ऋषींनी यज्ञ आरंभ केला. पर्वकाळ सुरू होताच एका मोठ्या वादळासह बल्व दानव आला. सर्वत्र दुर्गंधी येऊ लागली. त्याने यज्ञाच्या स्थळी मलमूत्र, रक्त, मांस टाकले. अवाढव्य व काळ्याकुट्ट शरीराचा लालबुंद दानव त्रिशुळासह प्रकट झाला. बलरामाने आकाशात संचार करणाऱ्या बल्वला नागराने ओढून त्याच्या डोक्यावर मुसळाचा घाव घालून त्याला ठार केले व ऋषींना भयमुक्त केले. ऋषींनी बलरामाची स्तुती करून त्याला दिव्य वस्त्रे व अलंकार अर्पण केले. तसेच कधीही न कोमेजणाऱ्या कमळाची वैजयंती माळ दिली.

त्यानंतर बलरामाने तेथून रोमहर्षणाच्या हत्तेच्या पातकाचे प्रायश्चित घेण्याकरिता तीर्थयात्रेसाठी प्रयाण केले. अद्भुत करणी करणाऱ्या बलरामाच्या चरित्राचे सकाळ-संध्याकाळ स्मरण करणारा भगवंताला प्रिय होतो असे श्रीमद्भागवतात म्हटले आहे.



# इव्हेंट मॅनेजमेंट कसे करावे

माणूस हा सामाजिक प्राणी. समाजामध्ये निरनिराळ्या कार्यक्रमांमधून, समारंभातून तो त्याचे अस्तित्व टिकवून असतो. हे टिकविण्यासाठी कार्यक्रमाची तयारी कशी करावी? आज आपण पाहूया तर एखादा कार्यक्रम, समारंभ, सोहळा पार पाडण्यासाठी सगळ्यात महत्त्वाचं असतं नियोजन! मग ते वेळ, पैसे, शक्ती यांचेही. आता हे सगळं आहे आपल्याकडे याच्या जोडीला युक्तीच नसेल सगळं पाण्यात! वेळ सर्वांना अनुकूल असावी. कार्यक्रमाची वेळ ठरवताना वार, दिनांक, सुट्टी, मुहूर्त पाहण्यात यावा. बरं अंतर दूर असेल तर पोहोचणारी मंडळी वेळेवर पोहोचतील का? याची खातरजमा करून घ्यावी. साधारण कार्यक्रमाच्या दिवशी वेळेआधी नियोजनामध्ये असलेल्या सर्व समिती अधिकारी, कर्मचारी यांनी कार्यक्रम स्थळी पोहोचावे. प्रेक्षक येणारी मंडळी सर्वांना आमंत्रण पोहोचली आहेत का? योग्यवेळी योग्य ठिकाणी ते कार्यक्रमाचे स्वरूप कसे? ती रूपरेखा काय? कशी? कार्यक्रम जास्तीत जास्त देखणा होण्यासाठी किंवा पार पाडण्यासाठी आपण कोणकोणते प्रयत्न करायचे? हे सुद्धा समजले पाहिजे. उदा. कार्यक्रमाचे स्वरूप मुंज, पाचवी, बारसं, साखरपुडा, लग्न, हळद, संगीत, मेहंदी, शुभमंगल, जन्मदिन, साठी, पंच्च्याहत्तरी इ., सुवर्णमहोत्सव, वर्धापन दिन, पूजा, स्पर्धा मेळावे, परिसंवाद, जयंत्या, बक्षिसे वितरण, पुस्तक प्रकाशन, शालेय गुणगौरव, महापुरुषांची जयंती, पुस्तके वाटप, बक्षीस वितरण, खेळ पैठणीचा, मनोरंजन, मैफल, नृत्य, नाट्य, काव्य, ग्रंथमहोत्सव, एकांकिका, मुलाखती, पथनाट्य, कला स्पर्धा, भजनी मंडळ स्पर्धा, साहित्यिक स्पर्धा, साहित्यिक मेळावे, सांस्कृतिक, शैक्षणिक, सामाजिक उपक्रमांचे कार्यक्रम, चर्चासत्रे, व्याख्यानमाला, बैठका, लावण्या, सांस्कृतिक, संदर्भ, विधायक कामांचे उद्घाटन, रस्ता उद्घाटन, मंदिराचा जीर्णोद्धार, गृहनिर्माण संस्थांचा, बचत गटांच्या उत्पादनाचे प्रदर्शन इ. मोठ-मोठे कार्यक्रम असे विविध प्रकार आणि स्वरूप असतात. या वैविध्यपूर्ण कार्यक्रमाला त्या-त्या कार्यक्रमानुसार संदर्भानुसार आखणी-देखील करावी लागते. मूळ कार्यक्रमाचे उद्दिष्ट ठरविणे. हेतू, दृष्टिकोन पाहता वयोगट, प्रेक्षक व जागा निश्चित करणे. ती नोंद श्रोतृवर्ग पाहता जसा वक्ता विषय ठरवावेत. तसेच प्रेक्षक मंडळी त्यांची मागणी, कल, अभिरुची, दर्जा विचारात घ्यावा. कार्यक्रमाची निवड, रूपरेषेवर भर द्यावा. तसा निवेदक नेमावा. नियोजन, आखणी, खर्च, कार्य विभागणी समिती जबाबदारी कामे वाटून द्यावी. विश्वासार्हता असावी. पारदर्शकता असावी. सर्वसमावेशकता असावी. कार्यक्रमाची रंगत वाढवण्यासाठी सर्वांनी



एकत्र येऊन, उदात्त हेतूने एकजुटीने कार्य तडीस न्यावे.



मनस्विनी

पूर्णिमा शिंदे

यशस्वी करावे आणि सर्वांना विचारात घेऊन सर्वांनी एकमेकांशी प्रेमाने वागावे. मी म्हणेल ती पूर्व दिशा असे नाही. तर चार अशी चार तशी माणसं असतात, पण त्यांना बरोबर घेऊन आपल्यासोबत टिकवावे. स्वतःला शहाणं समजतात, दुसऱ्याला मूर्ख समजतात. तो मीपणा, बडेजावपणा, आपलं घोडं पुढे दांबटणे, अति गर्व, अति राग, दुसऱ्यांना हीन, तुच्छ लेखणे. कमी लेखणे. स्वतः पुढे पुढे करणे. या विकृत प्रवृत्तींना थारा नसावा. संत मंडळी पंढरीची दिंडी पायी करतात. या पायवारीमध्ये जातात तेव्हा सगळी नाचून गाऊन दंग होतात. मग त्यांच्यात कुठे असते? ही मीपणाची बाब हा विकृतपणा. आपला कार्यक्रम देखणा, सुंदर सोहळा पार पाडावा. यासाठी कार्यक्रमाची तयारी ही एक-दोन महिने आधीच, अगोदर सुरू करावी. सर्वांना सोयीचे सभागृह आरक्षित करणे. खुर्च्या ठरविणे. व्यासपीठ, सजावट, माईक, बॅनर, चहापाणी, नाश्ता, निमंत्रण पत्रिका हे वेळेवर होण्यासाठी सर्वांनी लगबगीने काम करावे. कामात झोकून घ्यावे. एकाच माणसावर कामाचा लोड येऊ नये. पुष्पगुच्छ ऐवजी पुस्तके, झाडे, रोपटे, तुळशी दिल्यास पर्यावरण पोषक मूल्य रुजवली जातील. डीजे, ढोल, ताशा, लाऊडस्पीकर यापेक्षा सुरेल सनई सूर अथवा पसायदान, पखवाज मंदसूर गुंजावे. ध्वनिप्रदूषण होऊ नये. याची काळजी घ्यावी. सर्वांचा वेळ वाचेल, सर्व उपस्थित मान्यवर पाहुण्यांचे, वक्त्यांचे मनोगत, विचार ऐकता यावेत. शांतता बाळगावी, प्रत्येकास बोलण्यास समान वेळ दिल्यास बाकी पाहुण्यांवर अन्याय होणार नाही. याची दक्षता घ्यावी. कारण लांबून आलेले पाहुणे त्यांचे मोलाचे विचार ऐकावेत. त्यांची राहण्याची आणि जेवणाची उत्तम व्यवस्था असावी, त्यांच्या वयाचा आदर करावा, स्वागत करावे. सामाजिक भान कार्यक्रमाच्या जागी ठेवावे.

कधी कधी कार्यक्रम काही कारणाने रद्द झाला, तर त्यावेळी आपली मानसिकता वास्तव स्वीकारणारी असावी. अचानक निर्माण झालेली ओढावलेली आपत्ती, बदल, आयत्या वेळेची दुर्घटना याला तोंड देता यावे. त्याकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन समतोल साधणारा, सकारात्मक आणि संतुलन ठेवणारा असावा. पूर, त्सुनामी, अपघात, अशा निसर्ग आपत्कालीन समस्या ओढावतात. त्यामध्ये आयोजक नियोजकांनी खचून न जाता पुन्हा नव्या जोमाने सामोरे जावे. प्रत्येक गोष्टीतून नवनवे शिकावे. कार्यक्रमाच्या संदर्भ नवे निर्णय घ्यावेत, कार्यक्रमात उद्दिष्ट पूर्तीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत. कार्ये, सोहळा तडीस न्यावा. असे इव्हेंट करताना प्रसंगानुरूप निवेदक, प्रेक्षक, आयोजक यांच्या सुसंवाद हवा. सर्वांनी मिळून समारंभ उंचीवर नेण्यास प्रयत्न करावे आणि तो यशस्वी करावा. कार्यक्रमात सुसूत्रता असावी. देशनिष्ठा, सामाजिक भान, नैतिक मूल्य आणि मानवता या आनुषंगाने विशेष काळजी घ्यावी. असे असावे कार्यक्रमाचे इव्हेंट मॅनेजमेंट!

आज-काल सर्वच कार्यक्रमाचे इव्हेंट साकारताना प्रथम सर्वप्रथम आपली परिस्थिती अनुरूप आपण साकारावेत. समाजामध्ये सर्वांना बरोबर घेऊन चालावे. उच्चनीच भेदभाव नसावा. सर्वात महत्त्वाचे समता, एकता, बंधुता आणि मानवता या उद्दिष्ट पूर्तीसाठीच हे समारंभ असावेत. त्यातून काहीतरी आनंद लाभावा. हे उद्दिष्ट आणि संवेदनशीलता हे मूल्य जोपासावे.



# 'ये रीत अमर कर दो'

'प्रेमगीत' हा सुदश इशार याना दिग्दर्शित केलेला १९८१ सालचा सिनेमा. त्याची कथा होती शशी भूषण यांची आणि प्रमुख कलाकार होते राज बब्बर (आकाश भारद्वाज ऊर्फ कवी निशांत) आणि अनिता राज खुराना (शिखा). अनिता राजचा हा पहिला सिनेमा. तिने नंतर 'मेहेंदी रंग लायेगी'(१९८२), 'दुल्हा बिकता हैं'(१९८२), 'जरासी जिंदगी', 'प्रेम तपस्या', 'नौकर बीवीका', 'अच्छा बुरा', 'जीत हमारी', 'थाई विदु' ('जीत हमारी'चा तामिळ रिमेक), असे ८० च्या आसपास सिनेमा केले.

तिने १९८६ पासून टीव्हीवरही अनेक भूमिका केल्या. सध्याही ती 'ये रिश्ता क्या कहलाता हैं'मध्ये काम करते आहे. 'प्रेमगीत' मध्ये राजबब्बर आणि अनिताबरोबर मदन पुरी, रजनी शर्मा, सोकर जानकी, शशी रंजन, विजू खोटे, शम्मी (कपूर नाही.), कोमल सोनी, गुलशन ग्रोवर असे अनेक कलाकार होते.

या सिनेमाचे एक वैशिष्ट्य म्हणजे अनेकदा खलनायकाच्या भूमिका केलेला राज बब्बर प्रेमगीतमध्ये रोमँटिक नायक होता. तसेच फक्त खलनायकी भूमिकाच केलेले मदनपुरी प्रेमगीतमध्ये एका प्रेमळ पित्याच्या भूमिकेत होते.

आकाश मित्रात लोकप्रिय आहे. ते सगळे ट्रीपला म्हणून शिमल्याला जातात. तिथे हॉटेलमध्ये त्यांची भेट नृत्यांगना शिखाशी होते आणि तो तिच्या प्रेमात पडतो. आकाश हाच आपला आवडता कवी निशांत आहे हे माहीत नसल्याने तो जेव्हा ओळख करून घ्यायचा प्रयत्न करतो तेव्हा शिखा त्याचा अपमान करते; परंतु पुढे ओळख पटल्यावर त्यांचे प्रेम फुलते. आकाशचे वडील (मदन पुरी) या लग्नाच्या विरुद्ध असतात. आकाश जेव्हा त्यांना सांगतो की, शिखाला ब्रेन ट्युमर आहे आणि तिच्या हातात केवळ ६ महिनेच आहेत. तेव्हा सगळे चित्र पालटते. पूर्ण कुटुंबच तिची अतिशय प्रेमाने काळजी घेऊ लागते. आकाश तिच्याशी लग्नालाही अनुमती मिळवतो.

शिखाला आपल्या असाध्य रोगाबद्दल माहिती नसते. नंतर सगळेच सर्वांना माहीत होते. दुसऱ्याला दुःख होऊन नये म्हणून सगळेच हे नकोसे सत्य एकमेकांपासून लपवतात. शिखाही तेच करते.

एक असह्य दुःख मूकपणे सहन करताना प्रिय व्यक्तीवर तिच्या आयुष्यातील शेवटच्या क्षणापर्यंत प्रेमाचा वर्षाव करण्याची सर्वांची धडपड पाहून प्रेक्षकांचे डोळे पाणावतात. अस्सल अभिनयाचे अनेक क्षण आणि शशीभूषण यांचे संवाद केवळ अप्रतिम आहेत.



नॉस्टॅल्जिया

श्रीनिवास बेलसरे

दुर्दैवाने प्रेमगीत ही एक शोकांतिका होती आणि सिनेमात मोठी नावे नसल्याने उत्तम कथा, उत्तम अभिनय, उत्तम संगीत असूनही सिनेमाला हवी तेवढी प्रसिद्धी मिळाली नाही. काहींच्या मते प्रेमगीतच्या पूर्वी राज बब्बरने 'इन्साफ का तराजू'मध्ये केलेल्या नकारात्मक भूमिकेमुळे असे झाले असावे. मात्र १९८० च्या दशकातील रोमँटिक सिनेमांच्या मालिकेत प्रेमगीतचे स्थान एक क्लासिक चित्रपट असेच आहे.

हसरत जयपुरींचे एक गाणे आजही लोकप्रिय आहे. जगजीतजींचे कर्णमधुर संगीत गाण्यानंतरही कानात घुमत राहते. गाण्याचे शब्द होते -

*'होंठोंसे छू लो तुम,*
*मेरा गीत अमर कर दो.*
*बन जाओ मीत मेरे,*
*मेरी प्रीत अमर कर दो.'*

निशांत कवी आहे तर शिखा नृत्यांगना. ती त्याच्या कवितांची चाहती आहे. मात्र तिला आकाशच 'निशांत' आहे हे माहीत नाही. तो मात्र तिला कळकळीने विनवतो आहे, 'प्रिये, तू माझी कविता गाशील? तुझ्या ओठांच्या अमृतस्पर्शाने ती अमर होईल. तू माझ्या प्रेमाचा स्वीकार केलास तर तेही अमर होईल.'



आजपासून ४४ वर्षांपूर्वी कर्करोग असाध्य मानला जाई. त्याचे निदान म्हणजे मृत्यूचे बोलावणे असेच मानले जाई आणि तेव्हा ती वस्तुस्थिती होती. त्यामुळे पुढच्या ओळी येतात -

*'ना उम्रकी सीमा हो,*
*ना जन्मका हो बंधन.*
*जब प्यार करे कोई,*
*तो देखे केवल मन.*
*नयी रीत चलाकर तुम,*
*ये रीत अमर कर दो.'*

प्रिये, आयुष्याची मर्यादा प्रेमाला नसते. आयुष्य संपल्यावरही शिल्लक राहिले तरच ते खरे प्रेम. शरीर तर नष्ट होणारच आहे. त्यामुळे आयुष्य, शरीर, त्याचे सौंदर्य हे बघून प्रेम करण्यात काय अर्थ? महत्त्वाचे आहे ते मन आणि त्यातले अदृश्य प्रेम! तुही माझ्याप्रमाणे हे स्वीकार. आपण शरीरापेक्षा मनाला महत्व देण्याचा रिवाज प्रेमाच्या साम्राज्यात आपण रूढ करू. मला तुझी साथ दे.

प्रियतमेचे प्रेम न मिळाल्याने त्याला जीवन व्यर्थ वाटते आहे. तो म्हणतो, आकाश जसे पोकळ, मोकळे, रिते असते तसे माझे मन तुझ्या अनुपस्थितीने एकाकी आहे. तू पायातले पैंजण वाजवत माझ्या आयुष्यात ये ना. तुझ्या येण्याने माझी कविता, माझे संगीत चिरंजीवी होईल.

*'आकाशका सूनापन,*
*मेरे तनहा मनमें,*
*पायल छनकाती तुम,*
*आ जाओ जीवनमें.*
*सांसें देकर अपनी,*
*संगीत अमर कर दो.'*

शिखाला आपल्या जीवनातील तिचे महत्त्व पटावे म्हणून आकाश अनेक प्रकारे तिला विनवतो. तो म्हणतो मला कुणीही आवडले की नियती माझ्याशी क्रूर खेळ खेळते आणि ती व्यक्ती माझ्या जीवनातून निघून जाते. मी आजवर सगळीकडे हरत आलो आहे. पण निदान यावेळी तरी तू हे टाळू शकतेस. तुझे हृदय हरून तूच मला जिंकल्याचे सुख देऊ शकशील. कृपाकरून माझे प्रेम स्वीकारून त्याला अमरत्व दे ना.

*'जगने छीना मुझसे,*
*मुझे जो भी लगा प्यारा.*
*सब जीता किये मुझसे,*
*मैं हरदमही हारा.*
*तुम हारके दिल अपना,*
*मेरी जीत अमर कर दो.'*

'अखियोंके झरोकोंसे' 'मिली, 'आनंद', 'सफर' 'प्रेमगीत' 'एक दुजेके लिये' या सगळ्या शोकांतिका आहेत. आजच्या जगात कुणालाच दुःख अनुभवणे तर काय पाहणेही नको आहे. आयुष्य केवळ चंगळ, धमाल करत भोगायचे असते हा समज मनामनात बिंबवण्यात मनोरंजन विश्वाला प्रचंड यश आले आहे. त्यामुळे लोक फक्त धमाल, धूम, विनोद पाहण्यातच मनोरंजन आहे असे मानतात. मराठीत तर विनोदी चित्रपटांना, हास्य-मालिकांना सर्वांत जास्त पसंती मिळते; परंतु मास कम्युनिकेशनच्या ज्या अनेक थियरी आहेत त्यात एक 'थियरी ऑफ कॅथार्सिस' म्हणून ओळखली जाते. तिच्यानुसार जर सिनेमा नाटक, कादंबरी यात दुःख, संघर्ष, शोकांतिका पाहिल्या तर मनातील भावभावनांचे विनासायास विरेचन होते. त्या त्या पात्रांची दुःखे, आनंद, चिंता, अनुभवताना आपल्याही भावना मोकळ्या होऊन मन स्वच्छ होते, त्याची कुंठीत अवस्था संपून ते प्रवाही होते. म्हणून अशा कलाकृतीचाही आस्वाद अवश्य घेतला पाहिजे. मनाच्या निकोप, समतोल वाढीसाठी सुखांतिकाबरोबर शोकांतिकांचेही वेगळे महत्त्व आहे. यावर हरी नारायण आपटे १८९० सालीच म्हणून गेले आहेत, 'पण लक्षात कोण घेतो?'

# देव आणि माणूस...

वास्तविक हा प्रकार गेली वर्षानुवर्ष चाललाय म्हणे... मला मात्र हा प्रकार अगदी अलीकडेच समजला. वाराणसीच्या जगन्नाथ मंदिरात जगन्नाथावर दररोज महाभिषेक करतात. सततच्या अभिषेकामुळे देवाला सर्दी पडशाचा त्रास होतो अशी भाविकांची श्रद्धा आहे.

देवाला सर्दी पडसं झालं की देवही हैराण होणारच की, त्यालाही आराम हवाच. म्हणून देवाला आठ-दहा दिवस आराम दिला जातो. देवदर्शन बंद ठेवलं जातं. एवढंच नव्हे तर या दहा दिवसांच्या काळात देवावर औषधोपचारही केले जातात. लवंग, वेलची, जायफळ, तुळस, खडीसाखर, मध, चंदन, गुलाबपाणी आणि इतरही काही औषधी वनस्पती वापरून पुजारी मंडळी देवावर उपचार करतात. देवाला लेप वगैरे लावतात आणि देवाच्या अंगावरचा हा लेप नंतर भक्तांना प्रसाद म्हणून वाटण्यात येतो. भक्तही अगदी चवीने हा प्रसाद चाखतात आणि ताजेतवाने होतात. पुजाऱ्यांनी केलेल्या औषधोपचारामुळे आजारी पडलेला देव आठ-दहा दिवसांत खडखडीत बरा होतो आणि पुन्हा वर्षभर भक्तांना दर्शन द्यायला, त्यांची सगळी कामं करायला सज्ज होतो.

मी हे जे काही सांगितलंय यात एक पैशाचीही अतिशयोक्ती नाहीये. तुम्ही स्वतः वाराणसीच्या जगन्नाथ मंदिरात जाऊन खात्री करून घेऊ शकता. माणसांची श्रद्धा कोणत्या थराला जाऊन कोणतं रूप घेऊ शकते याचं हे एक उदाहरण. अशा प्रकारची अनेक उदाहरणं आपल्याला आढळतात.

वेगवेगळ्या ठिकाणी देवाला देवाला कोंबडी, बकरा मारून मटणाचा नैवेद्य दाखविला जातो तर काही ठिकाणी काही दैवतांना दारू देखील दिली जाते. शंकर महाराज नावाच्या एका संताच्या मठात तर म्हणे भाविक मंडळी नैवेद्य म्हणून चक्क सिगारेटी ठेवतात. तर आणखी कुठल्या तरी महाराजाला म्हणे तंबाखूची चिलीम अर्पण करतात. देवदासी या प्रकारात देवाची सेवा करण्याच्या नावाखाली मुलींना वाऱ्यावर सोडलं जातं. त्यांचं सारं आयुष्य देवाच्या नावाखाली उद्ध्वस्त केलं जातं. अर्थात हे झाले टोकाचे प्रकार. पण आपण सर्वसामान्य माणसं देखील संकष्टीला घरी मोदक करून गणपतीला नैवेद्य दाखवतोच की संकष्टी चतुर्थी, अंगारकीच्या निमित्ताने उपवास केला जातो. रोजच्या जेवणात थोडा बदल होतो. थोडं गोडधोड केलं जातं. पूजेच्या निमित्ताने घरात धुपाचा गंध दरवळतो, वातावरण सुगंधीत होतं. आपलं मन ताजंतवानं होतं.

कधीतरी वर्षातून आपल्या घरी एखाद्या इष्ट देवतेची पूजा किंवा विष्णुसहस्त्रनाम पठणाचा कार्यक्रम केला जातो. त्यानिमित्तानं चार माणसं एकत्र येतात. हे इथपर्यंत ठीक आहे. देवाचं अस्तित्व मानण्याला कुणाचीच हरकत नसावी. कारण देव ही संकल्पना फार प्राचीन आहे. हजारो, लाखो वर्षांपासून ही परंपरा चालत आलीये.

अगदी आदिमानवाच्या काळापासून ते आजच्या कॉम्प्युटर युगापर्यंत 'देव' नावाच्या शक्तीचं अस्तित्व सगळ्यांनीच मान्य केलंय. त्याबद्दल कुणीच आक्षेप घेण्याचं कारण नाही. पण... देव या संकल्पनेत ज्यावेळी माणसाचा स्वार्थ शिरतो त्यावेळी मात्र सगळंच नासून जातं. पातेलंभर दुधामध्ये चिमुटभर मीठ पडावं तसं होतं. मांगल्याचं रूपांतर अमंगलात होतं.

'देव आहे', 'तो शक्ती देतो', 'त्यानं दिलेली शक्ती संकटात भक्तांना तारते.' इथपर्यंत श्रद्धा असणं ठीक आहे. पण तो देव प्रसन्न व्हावा म्हणून त्याला नवस केले जातात. ते नवस करण्यासाठी 'पुजारी' नावाचा कुणी मध्यस्थ, दलाल लागतो. या मध्यस्थांमार्फत भक्तांनी देवाबरोबर बोलायचं. तो पुजारी म्हणजे देव आणि भक्त यांच्यातील जणू दुभाषाच असतो.



संवाद

गुरुनाथ तेंडुलकर

पुढे पुढे तर हा पुजारी देवापेक्षाही मोठा होतो. 'देवाला हे हवं.' आणि 'देवाला ते हवं.' असं सांगून गोरगरीब श्रद्धाळू भक्तांना हे पुजारी नागवतात. अनेकदा हे पुजारी केवळ देवळातच नसतात. भगत, गुरव, मांत्रिक-तांत्रिक अनेक रूपांत हे 'देवाचे दलाल' आपल्यासमोर येतात. भक्तांची श्रद्धा हेच यांचं भांडवल असतं. वेळप्रसंगी भोळ्या भाबड्या भक्तांना धाकही घातला जातो. पूजा अर्चा, होम हवन, मंत्रजागरपासून ते नारायण-नागबळीपर्यंत... क्वचित तर नरबळी सुद्धा...!

अलीकडे पुणे-मुंबई सारख्या मोठ्या शहरात या पुजारी मांत्रिक तांत्रिकांच्या बरोबरीने आणखी एक वर्ग उदयाला आलाय. तो म्हणजे बुवा, बापू, महाराज, स्वामी लोकांचा...

मंदिरातला पुजारी काय किंवा गावातला भगत-मांत्रिक हा केवळ भक्त आणि भगवंत यांच्यातला दुवा असतो. इथं तर हा बुवा-बापू म्हणजे साक्षात भगवंतच असतो. पुजारी भक्तांना देवाची पूजा करायला लावून पैसे उकळतो इथं तर हा बाबा भक्तांकडून स्वतःचीच पूजा करून घेतो. मांत्रिक तांत्रिक काय किंवा पुजारी गुरव काय कधीही स्वतः देवापेक्षा मोठे असल्याचा दावा करीत नाहीत. स्वतःचे फोटो विकत नाहीत.

सिद्धिविनायकाच्या देवळाजवळ फोटो विकले जातात ते गणपतीचे. सिद्धिविनायकाचे. पण इथं तर या 'बुवा-बापू'च्या सत्संगात त्या त्या बुवा-बापूचे फोटो विकले जातात. जिवंत माणसाचे फोटो लोक घरी घेऊन देव्हाऱ्यात लावतात. त्याची पूजा करतात. त्या बुवा-बापूची भक्ती करण्यात हे भक्त तल्लीन होऊन जातात. त्यामुळे आंधळी श्रद्धा कोणत्या थराला जाऊ शकते आणि कोणत्या प्रकारचं रूप घेऊ शकते याला सीमाच नसते. एकदा बुद्धी अंध झाली की विचार करण्याची शक्तीच खुंटते. आपल्या आजूबाजूला पाहिलंत तर आपल्याही ओळखी-पाळखीत, आप्त-मित्र-परिवारात अशा प्रकारची कोणत्या ना कोणत्या तरी बुवा-बापूच्या भजनी लागलेली आणि त्या बुवा-बापूला साक्षात देवाचा अवतार समजणारी माणसं आढळतील.

संत कबिराची एक गोष्ट आठवली म्हणून सांगतो... संत कबीर एकदा एका नदीच्या काठाने चालले असता त्यांनी एके ठिकाणी दहा-बारा माणसं गोळा झालेली पाहिली. ते जवळ गेले.

तिथं एक पुजारी काही तरी मंत्र पुटपुटत होता आणि लोक नदीच्या पात्रात भाताचे गोळे सोडत होते. कबीर जवळ गेले आणि त्यांनी हा काय प्रकार आहे अशी विचारणा केली. त्यावेळी त्यांना उत्तर मिळालं की, शेटजींचा मुलगा शिक्षणासाठी परदेशात गेला होता. तिथं त्याला कोणत्याही अडचणी येऊ नयेत. तिथं त्याला अन्नपाणी व्यवस्थित मिळावं म्हणून इथं ब्राह्मणांना सुवर्णमुद्रा दान करून हे भाताचे गोळे नदीच्या पात्रात सोडले जाताहेत.

कबीर हसले आणि त्यांनी नदीचं पाणी ओंजळीत घेऊन जोरजोरात ओरडत किनाऱ्यावर टाकायला सुरुवात केली. त्या शेटजींनी विचारलं, 'कबिरजी, हे काय चाललंय ?'

'मी माझ्या शेताला पाणी घालतोय...''पण तुमचं शेत आहे तरी कुठे?' शेटजींनी प्रश्न केला. 'शेत दोन मैलांवर आहे.' कबीर उत्तरले.मग इथं किनाऱ्यावर पाणी ओतून दोन मैलांवरच्या शेताला पाणी थोडंच मिळणार आहे?' शेटजींच्या चेहऱ्यावर आश्चर्य आणि नाराजी उमटली. 'कां नाही? जर तुम्ही इथं मंत्र म्हणून नदीच्या पाण्यात टाकलेलं अन्न हजारो कोस दूर असलेल्या तुमच्या मुलापर्यंत पोहोचतं तर मग माझं शेत तर फक्त दोनच मैल लांब आहे.' कबिरानं मिश्कीलपणे उत्तर दिलं.

कोणत्याही जिवंत बाबा-बापूच्या फोटोसमोर जेवणाचं ताट ठेवून नैवेद्य दाखविणाऱ्या भाबड्या भक्तांना जर तुम्ही हे सांगायला गेलात तर त्यांना ते पटेल? मुळीच पटणार नाही. उलट ते भक्त तुम्हालाच चार गोष्टी सुनावतील.

आमचे 'स्वामीजी' म्हणजे सामान्य माणूस नाहीच मुळी. ते साक्षात भगवंताचे अवतार आहेत. ते त्रिकाळज्ञ आहेत. त्यांना आपल्या मनातील सगळं कळतं. वगैरे वगैरे वगैरे... तुम्ही आणखी वाद घालायला गेलात तर तो भक्त तुम्हाला त्याला स्वतःला आलेल्या आणि इतरांना आलेल्या अनुभवाच्या चार गोष्टी सुनावेल.

बुद्धीने अंध झालेल्या अशा माणसांना सूर्योदय दाखविणं हा आपला मूर्खपणा ठरतो. तो करूच नये पण त्याचबरोबर आपण स्वतः वागतांना मात्र असे आंधळेपणाने तर वागत नाही ना याची वेळोवेळी जाणीव ठेवणं मात्र फार आवश्यक असतं. आपण अंधश्रद्धेच्या विळख्यात अडकून असला काही मूर्खपणा करीत नाही ना, याचा शोध प्रत्येकाचा प्रत्येकानं घ्यायला हवा.

जगात देव आहे की नाही या वादात न पडता देव ही निसर्गातली एक महान शक्ती आहे याची जाणीव ठेवून तिच्यासमोर नतमस्तक जरूर व्हावं. त्या शक्तीजवळ बुद्धी मागावी. मन एकाग्र होऊन हाती घेतलेल्या कार्यात यश दे अशी विनंती करावी. कार्य निर्विघ्न पार पडू दे अशी प्रार्थना करावी. पण त्याचबरोबर आपलं काम आपल्यालाच करायला हवं याची मनोमन जाणीव ठेवावी. देवाकडून फक्त प्रेरणा घ्यायची. उर्वरित कार्य स्वतःचं स्वतःच करायचं...

देव ही एक शक्ती आहे, व्यक्ती नाही याची सतत जाणीव ठेवायची आणि म्हणूनच देवाला सर्दी पडसं झालं म्हणून औषधोपचार करून त्याला आपल्यासारख्या सर्वसामान्य माणसांच्या पातळीवर आणू नये... आणि त्याचबरोबर... बाबा बापू - स्वामी - महाराज म्हणून वावरणाऱ्या एखाद्या जिवंत माणसाला 'अनंत कोटी ब्रम्हांडाचा नायक असं म्हणून देवाच्या पातळीवर नेऊ नये...! खरंय ना?

# बलरामाकडून ब्रह्महत्या व प्रायश्चित्त

बलराम श्रीकृष्णांचे मोठे बंधू तसेच दुर्योधन व भीम यांचे गुरू होते. दुर्योधन व भिमाला बलरामाने गदायुद्धाचे प्रशिक्षण दिले होते. जेव्हा कौरव पांडवामध्ये युद्ध होणार हे निश्चित झाले तेव्हा दोन्ही सैन्याची जुळवाजवळ करण्यासाठी भेटीगाठी घेणे सुरू होते. तेव्हा तटस्थ राहण्याच्या उद्देशाने बलराम तीर्थयात्रेला निघून गेले.

पृथूदक, बिंदूसर, त्रितकूप, सुदर्शनतीर्थ, विशालतीर्थ, ब्रह्मतीर्थ, चक्रतीर्थ आदी तीर्थक्षेत्रांना भेटी दिल्यानंतर ते नैमिषारण्यात आले. नैमिषारण्यात ऋषीमुनींचे सतत वास्तव्य होते. बलराम आल्याचे पाहून सर्व ऋषीमुनींनी उठून त्यांचा आदर सत्कार व स्वागत केले. मात्र रोमहर्षण आपल्या आसनावरच बसून होता. रोमहर्षण हा क्षत्रिय पित्याच्या व ब्राह्मण मातेच्या पोटी सुतकुळात जन्मलेला पूत्र होता. महर्षी व्यासांचा शिष्य असलेला रोमहर्षण ज्ञानी, पुराण, धर्मशास्त्र आणि इतिहासाचा अभ्यासक होता. एवढे असूनही तो बलराम व त्यांच्यासोबत आलेल्या ब्राह्मणांच्या स्वागतासाठी न उठल्याने त्याचीही कृती गर्विष्ठपणाची असल्याचे बलरामला जाणवले. त्यामुळे त्याचे अध्ययन हे केवळ धार्मिकतेचे ढोंग आहे आणि जे लोक धार्मिकतेचे ढोंग करून धर्माचे पालन करीत नाहीत ते अधिक पापी होत. त्यांना शासन करण्यासाठीच मी या जगात अवतार घेतला आहे असे म्हणून जरी बलराम तीर्थयात्रेसारख्या पवित्र कार्यात असले तरी त्यांनी दर्भाच्या साहाय्याने रोमहर्षणाला ठार केले.

हे पाहून सर्व मुनी हळहळले. तर देवांनी बलरामाला आपणच त्यांना हे ब्रह्मासन दिले असल्याचे सांगितले. त्यांची हत्या करून आपण अजाणतेपणाने का होईना ब्रह्महत्या केली आहे. आपण स्वतःच ज्ञानी आहात. तेव्हा आपण स्वतःच या ब्रह्महत्येचे प्रायश्चित्त घ्यावे असे सांगितले. तेव्हा बलरामाने देवताना प्रथम श्रेणीचे कोणते प्रायश्चित्त घ्यावे, अशी विचारणा केली. तुम्ही या सुताला काय देऊ इच्छिता ते सांगा. ते मी सर्व त्याला देईन असेही आश्वासन दिले, तसेच रोमहर्षणच्या जागी त्यांचा पुत्र तुम्हाला कथा सांगेल व तो दीर्घायुषी व बलशाली होईल, असे



सांगून पुन्हा आपल्या प्रायश्चिताबद्दल विचारणा केली.

तेव्हा ऋषी म्हणाले, बल्व नावाचा एक दानव यज्ञाच्या पर्व काळी येऊन कुंडात रक्त, मांस, मलमूत्र टाकून दूषित करतो. आपण त्याला ठार करा व त्यानंतर एक वर्ष भारतवर्षाची प्रदक्षिणा केल्यास आपण ब्रह्महत्तेच्या पापातून मुक्त व शुद्ध व्हाल. बलरामाने ऋषींचे म्हणणे मान्य केले. ऋषींनी यज्ञ आरंभ केला. पर्वकाळ सुरू होताच एका मोठ्या वादळासह बल्व दानव आला. सर्वत्र दुर्गंधी येऊ लागली. त्याने यज्ञाच्या स्थळी मलमूत्र, रक्त, मांस टाकले. अवाढव्य व काळ्याकुट्ट शरीराचा लालबुंद दानव त्रिशुळासह प्रकट झाला. बलरामाने आकाशात संचार करणाऱ्या बल्वला नागराने ओढून त्याच्या डोक्यावर मुसळाचा घाव घालून त्याला ठार केले व ऋषींना भयमुक्त केले. ऋषींनी बलरामाची स्तुती करून त्याला दिव्य वस्त्रे व अलंकार अर्पण केले. तसेच कधीही न कोमेजणाऱ्या कमळाची वैजयंती माळ दिली.

महाभारतातील मोतीकण

भालचंद्र ठोंबरे

त्यानंतर बलरामाने तेथून रोमहर्षणाच्या हत्तेच्या पातकाचे प्रायश्चित घेण्याकरिता तीर्थयात्रेसाठी प्रयाण केले. अद्भुत करणी करणाऱ्या बलरामाच्या चरित्राचे सकाळ-संध्याकाळ स्मरण करणारा भगवंताला प्रिय होतो असे श्रीमद्भागवतात म्हटले आहे.

# जड अंतःकरणाने श्रद्धांजली अर्पण

**अभिवादन:** लोकनेते विनायकराव मेटेंची जयंती

पुण्यभूमी प्रतिनिधी
बीड:लोकनेते विनायकराव मेटे यांची जयंती दि. ३० जून सोमवार रोजी त्यांच्या आठवणींना उजाळा देत साजरी करण्यात आली. सकाळपासूनच अभिवादनासाठी चाहत्यांनी मोठी गर्दी केली होती. सकाळी ११ वाजता सामुदायिक अभिवादन कार्यक्रम बीड येथील लोकनेते विनायकराव मेटे स्मृतीस्थळी पार पडला यावेळी सामाजिक ,राजकीय क्षेत्रातील मान्यवरांसह , शिवसंग्रामचे कार्यकर्ते, पदाधिकारी आणि मेटे साहेबांवर प्रेम करणारे असंख्य चाहते मोठ्या संख्येने उपस्थित होते.शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष दिवंगत विनायकराव मेटे साहेब यांच्या जयंती निमित्त त्यांचे स्मरण व्हावे यासाठीआज सकाळपासूनच गावो - गावी अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते वस्ती , वार्ड, तांड्यावर त्यांना अभिवादन करत जयंती साजरी करण्यात आली. गावातील ग्रामपंचायत कार्यालय, सामाजिक सभागृह, वाचनालय या ठिकाणी नागरिकांच्या वतीने त्यांना अभिवादन करण्यात आले .तर बीड येथील त्यांच्या स्मृतीस्थळी त्यांना सर्वपक्षीय सामुदायिक अभिवादन करण्यात आले. लोकनेते विनायकराव मेटे हे फक्त जिल्ह्याचे नेते नसून त्यांनी उभ्या महाराष्ट्र भर आपल्या सामाजिक कार्यातून दीनदलित, उपेक्षित, वंचित यांना न्याय मिळवून देण्याचे काम केले होते. त्यांच्या कार्याची गणना करणे अशक्य आहे. सामूहिक विवाह सोहळ्यातून त्यांनी अनेकांची संसार थाटले , कोविड काळात सर्वसामान्यांना मदतीचा हात दिला, दुष्काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीर पने उभा राहिले, व्यसमुक्तीसाठी लढा उभा केला , युवकांसाठी रोजगार मेळावे आयोजित केले. लोकनेते विनायकराव मेटे यांनी आपली उभी हयात समाजासाठी अर्पण करत समाजाच्या लढ्यासाठी घालवली. मराठा , मुस्लिम , धनगर आरक्षण मिळावे या मागणीसाठी त्यांनी जीवाची पराकाष्टा केली आपण शेवटच्या श्वासापर्यंत मराठा आरक्षण लढा चालू ठेवणार अशी भीष्म प्रतिज्ञा त्यांनी केली होती आणि त्यांचा शेवटही मराठा आरक्षणावर होवू घातलेल्या मुंबई येथील बैठीकाला जाताना झाला. या लढवय्या नेत्याच्या जाण्याने समजा पोरका झाला आहे. अशा बहु आयामी लोकनेत्याला समाज कधीच विसरणार नाही. अशी भावना उपस्थित व्यक्त करत होते.



यावेळी अनेकांना आपल्या भावना अनावर झाल्या अत्यंत जड अंतःकरणाने उपस्थितांनी श्रद्धांजली अर्पण केली. या प्रसंगी शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे,शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, अशोक हिंगे, दिलीप गोरे,नारायणराव काशिद, प्रा. सुभाष जाधव, राजेंद्र मस्के,उल्हास गिरम,उ- बी.बी. जाधव, अनिल घुमरे, रमेश चव्हाण, डॉ.प्रमोद शिंदे, राजाभाऊ मोहाले, नारायणराव थोरात, निवृत्ती डोके, तुळशीराम पवार, उत्तम पवार, ज्ञानेश्वर चौधरी, पंडित माने, प्रमोद कुलकर्णी महेश वाघमारे, संजय पवार, गोरख शिंदे, राजेश भुसारी,भास्कर गायकवाड, उदय जोगदंड, सुनील शिंदे,बाळासाहेब खोसे,नवनाथ प्रभाळे, बाबासाहेब पाटील, लिंबराज वाघ, दोडके फैजी आदी सह शिवसंग्रामचे कार्यकर्ते पदाधिकारी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**रक्तदात्याने केले रक्तदान**
लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या जयंती निमित्त बीड येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अशोक हिंगे, संजय पवार, अतुल लंगोरे आणि सुशील कांबळे यांनी रक्तदान करून शिबिराची सुरवात केली. या शिबिरात एकूण ६२ रक्तदात्यांनी रक्तदान करून मेटे साहेबांना श्रद्धांजली अर्पण केली.

## कामचुकार गिडमणीला हाकला

**परळीकरांसह कर्मचारी देखील वैतागले**

पुण्यभूमी प्रतिनिधी
परळी:भूमी अभिलेख कार्यालयातील उप अधीक्षक यांच्या कारभाराला तालुक्यातील अधिकारी आणि कर्मचारी वैतागले असून अशा कामचुकार व गैरहजर राहणाऱ्या अधिकाऱ्याची हकालपट्टी करण्याची मागणी जनतेतून होत आहे.याबाबत अधिक माहिती अशी की, परळी येथे तहसील कार्यालयाच्या प्रशासकीय इमारतीत दुसऱ्या मजल्यावर भुमी अभिलेख कार्यालय आहे.हे कार्यालय तालुक्यातील शेतकरी तसेच प्रत्येक नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.जमीनीचे खरेदी विक्रीचे व्यवहार नोंदणी करणे, मोजमाप करणे आदी महत्त्वपूर्ण कामे असतात. त्यामुळे सतत या कार्यालयात नागरिकांची गर्दी असते.परंतू उप अधीक्षक गिडमणी मात्र आठवड्यातून एक दिवसच परळीत येतात.बाकी घरूनच कारभार हाकत असतात. त्यांच्या या गैरहजारीला व मनमानीला कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी, नागरिक वैतागल्याचे बोलले जाते. अनेकांच्या नावनोंदणी फाईल जाणीवपूर्वक रिजेक्ट करून पुन्हा त्या सेटलमेंट करून, आर्थिक देवाण-घेवाण करून कामे होत असल्याचा आरोप जनतेतून होत आहे.एवढेच नाही तर परळी गंगाखेड रस्त्याचे काम आवश्यक कागदपत्रे न दिल्याने तीन वर्षे काम रखडले होते.यासही भुमी अभिलेख उप अधीक्षक जबाबदार असल्याचे चर्चा होत आहे. दरम्यान अशा मुजोर आणि कामचुकार अधिकाऱ्यांमुळे जनतेला गैरसोयीचा सामना करावा लागतो आहे. त्यामुळे वरिष्ठ पातळीवरुन कारवाई होणे नितांत गरजेचे आहे. अशी देखील मागणी परळी तालुक्यातील जनता करु लागली आहे.

## घरेलू महिला कामगार कार्यशाळा

**नियोजन:** युवाग्राम विकास संस्थेचा उपक्रम




पुण्यभूमी प्रतिनिधी
राहुरी:घरकामगार हे समाजातील एका मोठ्या उत्पादक वर्गाला सेवा पुरवतात. या प्रक्रियेत त्यांना जगण्यासाठी उत्पन्न मिळते. असंघटित क्षेत्रातील अतिशय महत्त्वाचा वर्ग असलेल्या घरकामगार महिलांना अनेक प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागते. शिक्षणाचा अभाव, आरोग्याच्या प्रचंड समस्या, कामाच्या ठिकाणी असुरक्षितता, कामाची अनिश्चितता आणि अत्यल्प वेतन अशा अनेक समस्यांना तोंड देणाऱ्या घरकामगार स्त्रिया आजही सामाजिक सुरक्षा पासून वंचित आहेत.त्यासाठी प्राध्यापक संभाजी पवार यांची युवाग्राम विकास संस्था गेल्या दोन वर्षापासून सातत्याने मजबुतीने कार्यरत आहे.त्यांचा कामाला आमचे सहकार्य व पाठबळ राहील असे प्रतिपादन स्नेहालय संस्थेच्या बालभवन प्रकल्पाचे संचालक हनीफ शेख यांनी केले.अध्यक्षस्थानी जेष्ठ पत्रकार राजेंद्र वाडेकर होते. याप्रसंगी युवाग्राम संस्थेचे अध्यक्ष संभाजी पवार,संचालक फिरोज शेख,अमोल सोनवणे शायिस्ता शेख,अनिता शेलार,आदित्य पवार आदि सह मान्यवर ऊपस्थित होते.अध्यक्षस्थानावरून बोलताना जेष्ठ पत्रकार राजेद्र वाडेकर म्हणाले की, घरकामगार कोणाचे उपकार घेत नाहीत. तर तेही श्रमिक आहेत. त्यांचा आदर त्यांच्या हक्काचे रक्षण आणि त्यांच्या जीवनमानाचा विकास हा समाजाचा आणि शासनाचा दोघांच्या जबाबदारीचा भाग आहे.युवाग्राम संस्थेच्या कार्याचे कौतुक करून त्यांनी मुलांच्या शिक्षणाचे महत्व सांगून,प्रशिक्षण घेऊन प्रगती करण्याचे महिलांना आवाहन केले स्वागत शायिस्ता शेख,तर आभार अनिता शेलार यांनी तर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अमोल सोनवणे यांनी केले.

## नागरिकांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम

**डॉ.दीपाताई क्षीरसागर:** उपस्थित राहण्याचे आवाहन

पुण्यभूमी प्रतिनिधी
बीड:ज्येष्ठ नागरिकांच्या आयुष्यात आनंदाची रंगत निर्माण करण्यासाठी आणि त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ देण्यासाठी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची बीड शाखा व केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू महाविद्यालयातील नाट्यशास्त्र व संगीत विभागाच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिकांसाठी बीडमध्ये येत्या दि.१७ रोजी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या बीड शाखा अध्यक्ष डॉ.दीपाताई क्षीरसागर यांच्या पुढाकारातून ज्येष्ठ नागरिकांसाठी उपक्रमाचे दरवर्षी आयोजन केले जाते. यामध्ये गीत गायन, नृत्य, नाटिका, काव्यवाचन, स्टँडअप कॉमेडी आदी कार्यक्रमांचा समावेश असणार आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनात आनंद निर्माण व्हावा तसेच तरुण वयात जोपासता न आलेले छंद साकार करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी इच्छुक ज्येष्ठ नागरिकांनी आपली नावे नोंदवावीत, डॉ.दुष्यंत रामटेके ९७६७३५५२९४, डॉ.संजय पाटील देवळाणकर ९४२२२९५३१४, डॉ.राहुल सोनवणे ९८२२५७७६७१, डॉ.दीपक जमधाडे ८८८८८५०३५८, यांच्याशी संपर्क करावा असे संयोजकांनी म्हटले आहे.



## आष्टीमध्ये बेशिस्त वाहनांवर दंड

**दणका:** वाहतूक पोलिसांनी आकारला २४ हजाराचा दंड



पुण्यभूमी प्रतिनिधी
कडा: आष्टीत शासकीय कार्यालयाच्या परिसरात नो पार्किंग परिसरात बेशिस्तपणे वाहने लावणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक शाखेच्या पोलिसांकडून दंडात्मक कारवाई करण्यात आली. वाहन चालकांवर २४ हजाराचा दंड पोलिसांनी आकारला आहे.आष्टीतील शासकीय कार्यालयासह रहदारीच्या मुख्य रस्त्यावर नो पार्किंग ठिकाणी बेशिस्त वाहनधारक चुकीच्या पद्धतीने वाहने लावून वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर आष्टी पोलिसांच्या वाहतूक शाखेकडून दंडात्मक कारवाई करण्यात आली. पोलिसांकडून सोमवारी ११ ते २ या वेळेत तहसिल कार्यालयासह न्यायालयाच्या परिसरात नो पार्किंग ठिकाणी बेशिस्त वाहने लावणाऱ्या वाहन धारकांवर वाहतूक शाखेच्या पोलिसांकडून दंडात्मक कारवाई करण्यात आली. दुचाकी वाहनचालकांवर एकाच दिवशी २४ हजाराचा दंड आकारला. पोनि शरद भुतेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक कृष्णा शिंदे, एएसआय मिसाळ, पोशि विलास गुंडाळे, पोलिस हवालदार नितीन काकडे, पोशि अशोक तांबे, पोशि वाणी यांनी कारवाई करण्यात आली.

## राष्ट्रसंत भगवान बाबांची पालखी

**आध्यात्मिक:** पाटोदा शहरामध्ये भव्य स्वागत

पुण्यभूमी प्रतिनिधी
पाटोदा: येथे राष्ट्रसंत श्री भगवान बाबांच्या पालखीचे आगमन हरिनामाच्या गजरात अत्यंत मंगल वातावरणात पार पडले. पाटोदा नगरपंचायतच्या वतीने तसेच आमदार सुरेश (आण्णा) धस मित्र मंडळ पाटोदा व गावकऱ्यांच्या वतीने पालखी सोहळ्याचे आणि सर्व वारकरी भाविक भक्तांचे पाटोदा नगरीत भव्य दिव्य स्वागत करण्यात आले.सकाळपासूनच गावातील रस्ते फुलांनी सजवण्यात आले होते. ढोल-ताशा, टाळ- मृदुंगाच्या गजरात हरिनामाचा जयघोष करत पालखी सोहळ्याचे स्वागत करण्यात आले. ग्रामस्थांनी पालखीवर फुलांची उधळण करून आपली श्रद्धा व्यक्त केली.या पालखी सोहळ्यामुळे संपूर्ण पाटोदा नगरी भक्तिमय वातावरणाने न्हालेली होती. अनेक वारकरी भाविक भक्त या सोहळ्यात सहभागी होऊन विठुरायाच्या नामस्मरणात तल्लीन झाले होते. या भव्य स्वागतासाठी पाटोदा नगरपंचायतचे पदाधिकारी, आमदार सुरेश (आण्णा) धस मित्र मंडळाचे पदाधिकारी, गावातील नागरिक व तरुण मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी एकत्र येत उत्तम व्यवस्थापन करून पालखी सोहळा अत्यंत शिस्तबद्ध व भक्तिमय वातावरणात पार पाडला.



## हरित क्रांतिच्या प्रणेत्यास अभिवादन

**नियोजन:** विद्युत केंद्रात वसंतराव नाईक जयंती




पुण्यभूमी प्रतिनिधी
औष्णिक विद्युत केंद्रात दि १ जुलै रोजी हरित क्रांतीचे प्रणेते महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कार्यकारी अभियंता कुंदन राठोड हे होते कार्यक्रमाच्या सुरुवातीला वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कामगार नेते सोपान चौधर यांनी वसंतराव नाईक यांच्या जीवन कार्यावर मार्गदर्शन केले. समारोप करताना कुंदन राठोड म्हणाले की, नाईक साहेबांच्या कार्यकाळात कृषी धोरण प्रभावीपणे राबविण्यात आले होते. यावेळी महानिर्मितीचे सुरक्षा अधिकारी वरिष्ठ व्यवस्थापक बी आर अंबड ,जायभाये, सोपान चौधर, बालाजी पवार, विनोद राठोड, आदिची उपस्थिति होती कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजू गजले यानी केले तर उपस्थितांचे आभार सहाय्यक कल्याण अधिकारी शरद राठोड यानी मानले.

## मासिक सभेला सदस्यांचा विरोध

**बोंबला:** सुलतानपुर ग्रामपंचायतचा कारभार

पुण्यभूमी प्रतिनिधी
लोणार:सुलतानपूर येथील ग्रा.प चा मनमानी कारभार दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे आज दि ३० जून रोजी घेतलेल्या मासिक सभेला नऊ ग्राप सदस्यांनी विरोध केल्याने सरपंच किरण लाहोटी यांना विरोध झाला असून सरपंचा यांच्या बाजुला आठ सदस्यांनी समंती दर्शविली आहे. याबाबत अधिक माहिती अशी कि सुलतानपुर ग्राप च्या सरपंच पदी सौ किरण लाहोटी अडीच वर्षीपूर्वी विराजमान झाल्या मात्र गत अडिच वर्षापासून त्यांचा मनमानी कारभार सुरू होता, याबाबत वेळेवेळी सदस्यांनी तक्रारीही केल्या मात्र यावर ठोस कारवाई झाली नाही यामुळे ग्राप सदस्यांनी आज दि ३० जून रोजी मासिक सभा झाली या सभेत शासनाचे परिपत्रक वगळता विविध ठराव नऊ सदस्यानी बहुमता ने म नामंजूर करून विरोध दाखवला तर आठ सदस्य संरपचासह यांनी संमती दर्शविली . यामुळे सरपंच यो च्या मनमानी कारभारा मुळे ग्राप सदस्य त्रस्त झाले आहे. यामुळे आगामी काळात ग्राप सदस्य सरपंच यांच्या विरोधात काय भुमिका घेतात याबाबत नागरिकांना उत्सुकता लागुन आहे. तसेच ग्रामसेवक गजानन कावरखे यांचीही मासिक सभेत बदली करावी याबाबत ठराव मंजुर झाला आहे हे विशेष.दरम्यान सरपंच व सचिव मनमानी कारभार करतात याला त्रस्त होवून आम्ही मासिक सभेला बहुमताने विरोध दाखवला, अशी माहिती संघपाल पनाड ग्राप सदस्य यांनी दिली.

# बँकेने दाखविलं असंही सामाजिक दायित्व!

**ऋणानुबंध:** शाळेला दिली सोलर ऊर्जेवर चालणाऱ्या पंख्यांची भेट

पुण्यभूमी प्रतिनिधी
कडा:भारतीय स्टेट बँकेच्या ७० व्या वर्धापन दिनाचं औचित्य साधून येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेला सोलर उर्जेवर चालणाऱ्या १२ पंख्यांची भेट देऊन शाखा व्यवस्थापक नवनाथ शेळकेंसह कर्मचाऱ्यांनी समाजाप्रती असलेलं सामाजिक दायित्व दाखवून दिले.भारतीय स्टेट बँकेचा एक जुलै हा ७० वा वर्धापन दिन आहे. या वर्धापन दिनानिमित्त कडा शाखेच्या वतीने बँकेच्या ग्राहकांना पुष्पगुच्छ व मिठाई वाटून हा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. तसेच आपणही समाजाचं काहीतरी देणे लागतो हा उदात्त हेतू डोळ्यासमोर ठेवून येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेला बँकेचे व्यवस्थापक नवनाथ शेळके यांच्या संकल्पनेतून सोलर उर्जे वर चालणाऱ्या १२ पंख्यांची बँकेकडून विशेष भेट शाळेचे मुख्याध्यापक पाचारणे यांना प्रदान करण्यात आली. याप्रसंगी बँकेचे व्यवस्थापक नवनाथ शेळके, प्रदीप रुपनर, शालेय व्यवस्थापन समितीचे दीपक कर्डिले इब्राहिम सय्यद, अनिल ढोबळे, नागेश कर्डीले यांच्यासह शाळेचे शिक्षक, शिक्षिका उपस्थित होते. दरम्यान ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणात ऊर्जा संकटामुळे अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी सामाजिक भूमिकेतून स्थानिक जिल्हा परिषद शाळेला सौरऊर्जे वर चालणारा पंखा भेट दिला. उन्हाळ्यात विद्यार्थ्यांना दिलासा मिळावा, हा यामागील उद्देश आहे. या उपक्रमाचे गावात सर्वत्र कौतुक होत आहे. शाळेचे मुख्याध्यापक आणि पालकांनी याबद्दल आभार व्यक्त केले



"आपणही या समाजाचं काहीतरी देणे लागतो, याच सामाजिक दायित्वाच्या भावनेतून ज्या ज्ञान मंदिरातून आपणही घडलो. त्या शाळेला बँकेच्या वर्धापन दिनानिमित्त छोटीशी भेट देण्याचा आम्ही प्रयत्न केला.

**-नवनाथ शेळके**
**बँक शाखा व्यवस्थापक कडा**

## तहसील कार्यालयाने पाठपुरावा केला

**संदीप खोमणे: समितीमुळे घरकुल धारकांना वाळू मिळेना**

पुण्यभूमी प्रतिनिधी
गेवराई:घरकुल धारकांना मोफत वाळू मिळणार अशी नवीन योजना आहे. या योजनेची अंमलबजावणी होण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने पंचायत समितीच्या विभागांना सूचना देण्यात आल्या आहेत. परंतु पंचायत समितीच्या विभागाकडून वेळेत माहिती देण्यात आली नाही. अशी माहिती गेवराई चे तहसीलदार संदीप खोमणे यांनी दिली आहे.या योजनेमध्ये घरकुलधारकांना वाळू मिळण्यासाठी तालुक्यातील मंजूर घरकुलधारकाचे नाव विहित नमुन्यामध्ये महसूल विभाग यांना दिल्यानंतर संबंधित महसूल विभागाच्या वतीने ती यादी गौण खनिज यांच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात येते. त्यानंतर संबंधित घरकुलधारकाच्या नावे ईटीपी पावती तयार होऊन वाळू देण्यात येते. गेवराई तालुक्यातील घरकुलधारकांना या नियमानुसार काम झाले असते. आठ दिवसांमध्ये वाळू मिळाले असते परंतु महसूल प्रशासनाने वारंवार पंचायत समिती यांना मंजूर घरकुल धारकांची यादी विशिष्ट नमुन्यामध्ये पाठवण्यासाठी पत्रव्यवहार केला परंतु पंचायत समिती विभागाकडून कुठलाही पाठपुरावा होत नव्हता यासाठी स्मरण पत्र ही गटविकास अधिकारी यांना देण्यात आले तरीदेखील यादी उपलब्ध झाली नाही. घरकुल मंजूर झालेली यादी ९ जून च्या अगोदर गौण खनिज या संकेतस्थळावर महसूल विभागाच्या वतीने अपलोड करण्याची संधी होती. पंचायत समिती विभागाने मंजूर भरपूर धारकाचे याद्या न दिल्याने महसूल विभागाला या याद्या या संकेतस्थळावर दाखल करता आल्या नाही. त्यासाठी तहसील कार्यालय जबाबदार नाही.गेवराई तालूक्यात्तील घरकूल बांधकामासाठी वाळू मिळणे बाबतचे लाभार्थी यांची यादी देण्यात येणारे विवरणपत्रात एक्सेलशीट मध्ये गावनिहाय, पीडीएफ करून माहीती तात्काळ सादर करणे बाबत वारंवार पंचायत समिती विभागाला पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. याबाबतचे स्मरण पत्र ही देण्यात आले असून पंचायत समिती विभागाने घरकुल लाभार्थ्यांची यादी न दिल्याने घरकुलधारक वाळू मिळण्यापासून वंचित राहिले आहे.